वडापावचे हे ताजे निमित्त वर्तमानपत्राच्या कागदाशी निगडित असले आणि त्याविरोधात मुंढेंनी काही भूमिका घेतली त्याप्रमाणे आज प्लास्टिकचे प्रदूषण टाळण्यासाठी प्लास्टिकच्या पेल्यांऐवजी कागदी पेले वापरले जातात. अनेक ठिकाणी किंवा काही लग्नसमारंभांमध्येसुद्धा या पेल्यांमधून चहा वगैरे दिला जातो. मध्यंतरी या पेल्यांबाबतसुद्धा अशाच तक्रारी आल्या होत्या. कारण हे पेले जोडण्यासाठी वापरले जाणारे मेण किंवा तत्सम पदार्थ हा त्या गरम चहा, कॉफी किंवा दुधामुळे काही प्रमाणात तो वितळतो आणि चहाबरोबर आपल्या शरीरातही जातो. मग यासारख्या अनेक गोष्टींबाबतसुद्धा अन्न, औषध प्रशासन विभागाला काही ना काही उपाय करावे लागतील. एकूणच दैनंदिन जीवनामध्ये नकळतपणे अनेक गोष्टी वापरल्या जातात. आणि त्या तितक्याच छुप्या पद्धतीने शरीरावर प्रतिकूल परिणामही करीत असतात. याचा अर्थ बदलती जीवनशैली आणि त्यात वापरल्या जाणाऱ्या शेकडो वस्तू किती वेगवेगळ्या पद्धतीने धोके निर्माण करतात हे स्पष्ट होईल. खूप व्यापक प्रमाणावर आणि तितक्याच गंभीरतेने या गोष्टींचा विचार होऊ शकतो. मग केंद्र सरकारला रेल्वे स्थानकं, राज्य सरकारला बसस्थानकं या ठिकाणी अधिकृत स्टॉलवरसुद्धा वर्तमानपत्रातून खाद्यपदार्थ देण्यावर निर्बंध आणावे लागतील. मोहीम चांगली आहे, पण ती शेवटापर्यंत नेण्यासाठी बरेच अडथळे आहेत. पावसाळ्याच्या दिवसात तर मुंबईसारख्या महानगरात अशा खाद्यपदार्थांबाबत खूपच काळजी घ्यावी लागते. महापालिका तर उघड्यावर खाद्यपदार्थ विक्रीला सरळसरळ बंदी घालते. पण काही का असेना वडापावच्या चर्चेच्या निमित्ताने काही मुद्दे समोर आले आहेत.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

परिस्थिती जेव्हा हाताबाहेर जाते तेव्हा फक्त संघर्ष करायची तयारी ठेवा, विजय आपोआप मिळेल.

## पंचांग

बुधवार, १० जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर



* अधिक ज्येष्ठ कृष्ण दशमी
नक्षत्र : उत्तरा भाद्रपदा

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मीन

रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१४

राष्ट्रीय दृष्टीदान दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### अंड्याची शाकशुका



★ **साहित्य :** - अंडी - ४, कांदे - १, सिमला मिरची - २, टोमॅटो - ३ किंवा १ कप ताजी टोमॅटो प्युरी, लसूण - २ पाकळ्या, आले - १/२ इंच, लाल मिरची पावडर - १ टीस्पून, हळद पावडर - १/२ टीस्पून, मीठ - चवीनुसार, साखर -१/३ टीस्पून (स्वाद संतुलित करण्यासाठी) तेल - १ टेबलस्पून, किसलेले चीज किंवा पनीर - १/२ कप (ऐच्छिक).

★ **कृती :** - सर्वप्रथम कांदे लांब चिरून घ्या. सिमला मिरची, टोमॅटो बारीक कापून घ्या. लसूण, आलेही अगदी बारीक कापून घ्या. आता गॅस चालू करून त्यावर पॅन ठेवा. पॅनमध्ये तेल गरम करा. त्यात चिरलेला लसूण व आले घालून परता. आता कांदा घाला आणि पारदर्शक होईपर्यंत शिजवा. यानंतर सिमला मिरची घाला आणि काही मिनिटे शिजवा. आता त्यात तिखट, हळद, मीठ, साखर आणि चिरलेला टोमॅटो किंवा टोमॅटो प्युरी घाला. सर्वकाही चांगले मिसळा आणि ५ मिनिटे शिजू द्या, जेणेकरून टोमॅटो सॉस थोडा घट्ट होईल. हे मिश्रण एकजीव होईपर्यंत चांगले परतून घ्या. मिश्रण एकसारखे पसरून घ्या. त्यात चमचाच्या सहाय्याने ४ लहान खड्डे बनवा. प्रत्येक खड्ड्यात एक अंडे काळजीपूर्वक फोडून टाका. ते जराही हलवू नका. पॅन झाकून ठेवा आणि मंद आचेवर अंड्याचा पांढरा भाग कडक होईपर्यंत शिजवा, शेवटी किसलेले चीज घालून गरमागरम सर्व्ह करा.

## क्रीडा

# टी-२० मालिकांपूर्वी भारतीय संघात बदल! सिराजला विश्रांती

## आयर्लंड-इंग्लंड दौऱ्यासाठी प्रसिद्ध कृष्णाची निवड




**आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकांपूर्वी भारतीय संघात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला कामाचा ताण लक्षात घेऊन विश्रांती दिली असून, त्याच्या जागी प्रसिद्ध कृष्णाची निवड करण्यात आली आहे. आगामी व्यस्त आंतरराष्ट्रीय हंगामाच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने हा खबरदारीचा निर्णय घेतला आहे.**

■ नवी दिल्ली

**बीसीसीआयच्या** वैद्यकीय पथकाने आणि संघ व्यवस्थापनाने संयुक्तपणे हा निर्णय घेतला आहे. बोर्डाच्या मते, सिराज पूर्णपणे ताजातवाना आणि फिट राहावा यासाठी हा खबरदारीचा उपाय करण्यात आला आहे. आयर्लंडविरुद्धच्या दोन आणि इंग्लंडविरुद्धच्या पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या संघात सिराजचा समावेश होता. मात्र, त्याला विश्रांती देण्याचा निर्णय अखेरीस घेण्यात आला.

सिराजच्या अनुपस्थितीत प्रसिद्ध कृष्णाला मोठी संधी मिळाली आहे. देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएलमधील सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्याने पुन्हा भारतीय संघात स्थान मिळवले आहे. आपल्या उंचीचा आणि अतिरिक्त उसळीचा प्रभावी वापर करणारा कृष्णा आता भारतीय वेगवान गोलंदाजी आक्रमणातील आपले स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

काही दिवसांपूर्वी अफगाणिस्तान-विरुद्धच्या कसोटी सामन्यासाठीही सिराजला विश्रांती देण्याची चर्चा होती. मात्र तो त्या सामन्यात खेळला आणि फलंदाजीसह गोलंदाजीतही योगदान दिले. आता आगामी महत्त्वाच्या स्पर्धा आणि मालिकांचा विचार करून त्याला विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, २०२८ टी-२० विश्वचषक आणि लॉस एंजेलिस ऑलिम्पिकच्या तयारीच्या दृष्टीने भारताने नव्या टी-२० संघाची घोषणा केली आहे. श्रेयस अय्यरकडे संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले असून, तिलक वर्माची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

संघ निवडीतील सर्वात चर्चेचा विषय ठरला तो १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा समावेश. आयपीएल २०२६ मध्ये दमदार कामगिरी केल्यानंतर त्याला भारतीय संघात स्थान मिळाले आहे. या दौऱ्यात खेळण्याची संधी मिळाल्यास तो भारताच्या पुरुष संघातून पदार्पण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरू शकतो.

भारताचा संघ २६ आणि २८ जून रोजी बेलफास्ट येथे आयर्लंडविरुद्ध दोन टी-२० सामने खेळेल. त्यानंतर १ जुलै ते ११ जुलैदरम्यान इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाईल. सिराजला विश्रांती देऊन प्रसिद्ध कृष्णाला संधी दिल्याने भारतीय संघ व्यवस्थापन आगामी व्यग्र वेळापत्रकापूर्वी आपल्या वेगवान गोलंदाजीतील पर्यायांची चाचपणी करण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## इंडिया-ए संघाचा थरारक विजय

**ऋतुराज गायकवाडचे शतक**

■ जयवर्धनेपुरा

**दंबुला** येथे झालेल्या तिरंगी मालिकेतील पहिल्याच सामन्यात इंडिया-ए संघाने श्रीलंका-ए संघावर ८ धावांनी विजय मिळवत स्पर्धेला दमदार सुरुवात केली. सुरुवातीलाच दोन महत्त्वाचे फलंदाज गमावल्यानंतर ऋतुराज गायकवाडने संयमी आणि दर्जेदार शतकी खेळी करत भारतीय डाव सावरला. तर कर्णधार तिलक वर्मानेही अर्धशतक (६०) झळकावत साथ दिली. या दोघांच्या भागीदारीच्या जोरावर भारताने ५० षटकांत ६ बाद २७७ धावांचा डोंगर श्रीलंकेच्या संघाला पेलवला नाही. त्यांचा डाव ४८.५ षटकांत सर्वबाद २६९ धावांमध्ये गुंडाळला.

२७८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंका-एच्या सलामीवीरांनी दमदार सुरुवात केली. निरोशन डिकवेला आणि अविष्का फर्नांडो यांनी ९३ धावांची सलामी देत भारताला दबावाखाली आणले. मात्र, आयुष बदोनीने सलग दोन बळी घेत सामन्याला कलाटणी दिली. त्यानंतर विप्रज निगम, अनुकूल रॉय आणि अंशुल कंबोज यांनी अचूक मारा करत श्रीलंकेच्या मधल्या फळीला लगाम घातला. सहान अराचिगेने ७४ धावांची झुंजार खेळी करत श्रीलंकेच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या.

## फुटबॉल वर्ल्डकपपूर्वी वाद

**मियामी** - फिफा विश्वचषक २०२६ ला सुरुवात होण्यापूर्वीच स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. मात्र स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वीच व्हिसा वाद, खेळाडूंची चौकशी, पंचांना प्रवेश नाकारणे आणि तिकिटांच्या किमतींवरील नाराजी यामुळे फिफा आणि यजमान अमेरिकेची तयारी टीकेच्या केंद्रस्थानी आली आहे.

## पाकिस्तानात खेळू शकतो तर भारतात का नाही?

**ढाका - भारतात** झालेल्या टी-२० विश्वचषकातून बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव माघार घेतल्यानंतर आता या निर्णयावरच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. बांगलादेशचा टी-२० कर्णधार लिटन दास याने पाकिस्तानात खेळू शकतो, तर भारतात का नाही? असा थेट सवाल करत अधिकृत भूमिकेलाच आव्हान दिले आहे. त्याच्या वक्तव्यामुळे विश्वचषक बहिष्कारामागील खरे कारण काय होते, याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**
Tenders are invited for procurement of 22 KV Heat Shrinkable Straight Through Jointing Kits and 22 KV Heat Shrinkable Outdoor/Indoor/Touch Proof End Termination suitable for various sizes of H.T. XLPE Cables with Estimated Cost of Rs. 720.00 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-06/0626 due for submission on dtd. 30-06-2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/
HO PR 133/26 Chief Engineer (MMD)

**जाहीर सूचना**
याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील विद्यमान मालक (१) कुलदीप सिंग भामरा (हिंदू अविभक्त कुटुंब) त्यांचे कर्ता श्री. कुलदीप सिंग भामरा यांच्या द्वारे, (२) हरपाल सिंग भामरा (हिंदू अविभक्त कुटुंब) त्यांचे कर्ता श्री. हरपाल सिंग भामरा यांच्या द्वारे, (३) सौ. सुखविंदरकौर कुलदीप सिंग भामरा, (४) सौ. सिमरन कौर हरपालसिंग भामरा, यांच्याकडून एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३ येथे स्थित विक्रोळी शिवकृपा इंडस्ट्रियल प्रिमायसेस को ऑपरेटिव्ह सोसायटी लि., नोंदणी क्र. बीओएम/जीआरएन/एन-प्रभाग/२०५१ दिनांक २१.०८.१९८१ च्या "शिवकृपा" इंडस्ट्रियल इस्टेटमधील युनिट क्र. १, मोजमाप १२५० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ, म्हणजेच ११९.७० चौ.मी. (प्रत्यक्ष मोजमाप १२८८ चौ.फू. कार्पेट) ("सदर जागा") ही सर्व बोज्यांपासून मुक्त असलेली औद्योगिक जागा खरेदी करण्यास इच्छुक आहेत. कोणा व्यक्ती/व्यक्तींचा सदर जागा किंवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, गहाणवट, भेट, हुकूम, ताबा, वारसा, न्यायालयीन हुकूम या मार्गे किंवा अन्यथा कोणताही हक्क किंवा दावा असल्यास त्यांनी त्याबाबत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांच्या, आकांक्षा, २रा मजला, आयसीआयसीआय बँकच्या वर, साने गुरुजी नगर, मुलुंड ४०००८१ येथील कार्यालयात, येथील दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास असे समजण्यात येईल की, त्यावर कोणतेही असे दावे नाहीत आणि जर असल्यास, ते सोडून दिले किंवा त्याग केले आणि अशा दाव्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय सदर जागेची विक्री माझ्या अशिलाच्या नावे पूर्ण करण्यात येईल.
दिनांक १० जून, २०२६
**(समीर के. वैद्य)**
ॲडव्होकेट

**फॉर्म क्र. यूआरसी-२**
*प्रकरण XXIच्या भाग I अन्वये नोंदणीकरणाबाबत सूचना देणारी जाहिरात*
*[कंपनी कायदा, २०१३ चे कलम ३७४(बी) आणि कंपनी (नोंदणीकरिता प्राधिकृत) विनियमन, २०१४ च्या विनियमन ४(१) नुसार]*
१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, केंद्रीय नोंदणीकरण केंद्र यांच्याकडे अर्ज करण्यात आला आहे की, मे. अर्थम कॅपिटल ॲडव्हायजर्स एलएलपी या नोंदणीकरण क्र.: एसीएन-१४१८ धारण केलेल्या एलएलपीचे कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरण XXIच्या भाग I अन्वये भागांद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकरण होऊ शकते.
२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:
कर्ज सिंडिकेशन आणि आर्थिक सल्ला सेवांसाठी मध्यस्थ आणि सल्लागार म्हणून काम करणे, ज्यामध्ये बँका आणि वित्तीय संस्थांकडून मुदत कर्ज, खेळते भांडवल कर्ज, प्रकल्प वित्त, बाह्य व्यावसायिक कर्ज (ईसीबीज) आणि इतर कर्ज साधनांची व्यवस्था करणे आणि सुलभता आणणे; योग्य कर्जदात्यांना ओळखणे; पुनर्वित्तपुरवठा, आर्थिक पुनर्रचना, पत मूल्यांकन, जोखीम मूल्यांकन आणि कर्ज सल्ला सेवा प्रदान करणे; कर्ज दस्तऐवज आणि अनुपालन आवश्यकतांच्या तयारीमध्ये सहाय्य करणे; आणि व्यक्ती, कॉर्पोरेट्स, भागीदारी संस्था आणि इतर संस्थांसाठी कर्ज व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, तणावग्रस्त मालमत्ता निराकरण आणि पतपात्रता वाढविण्याशी संबंधित सल्ला देणे यांचा समावेश आहे.
३. प्रस्तावित कंपनीचा निवेदन मसुदा आणि संघटनेची घटनेची प्रत अर्थम कॅपिटल ॲडव्हायजर्स एलएलपी, १० वा मजला, नेस्को टॉवर ४, सी विंग, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पू), नेस्को आय.टी. पार्क, गोरेगाव पूर्व, मुंबई, गोरेगाव पूर्व, महाराष्ट्र, भारत, ४०००६३ येथील कार्यालयात पाहता येईल.
४. याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणाही व्यक्तीचा या अर्जास आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर ५ आयएमटी, मानेसार, जिल्हा गुरगाव, हरयाणा - १२२०५०, हरयाणा, भारत येथे या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत कळवावे आणि त्याची प्रत कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवावी.
दिनांक १० जून, २०२६
अर्जदाराचे नाव(वे)
१. भूषण प्रेमानंद शिरोडकर
२. सौरभ राजन चौबळ

**पश्चिम रेल्वे**
**विद्युत काम**
वरि.विविअभि/पी/बीसीटी, मुंबई सेंट्रल आमंत्रित करीत आहेत **निविदा सूचना क्र.: ईएल-८१-२-६७६-डब्ल्यूए-२२ दिनांक ०५.०६.२०२६. काम आणि ठिकाण:** चर्चगेट - ३ ऱ्या मजल्यावरील प्रवासी पणन विभाग आणि यूटीएस पॅसेंजी इमारत दुरुस्ती आणि नूतनीकरणाशी संबंधित विद्युत (वीज) काम. **कामाचे अंदाजित मूल्य:** ₹ २०,३०,७१५.००. **ईएमडी:** ₹ ४०,६००.००. **सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ:** दि. ०२.०७.२०२६, १५.०० वा. पर्यंत. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** दि. ०२.०७.२०२६, १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 0214
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**
Tenders are invited for procurement of 33 KV Heat Shrinkable Straight Through Jointing Kits and 33 KV Heat Shrinkable Outdoor/Indoor/Touch Proof End Termination suitable for various sizes of H.T. XLPE Cables with Estimated Cost of Rs. 791.12 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-07/0626 due for submission on dtd. 30-06-2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/
HO PR 131/26 Chief Engineer (MMD)

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**नायर रुग्णालय दंत महाविद्यालय**
क्र. डीसी/२१२२/एसटीआर दि. ०९.०६.२०२६
**ई-निविदा सूचना**

| क्र. | बोली क्र. | बोली सुरुवात दिनांक | बोली समाप्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १ | डीसी/१५५६/एसटीआर दि. १८.०५.२०२६ दातांच्या कवळीसाठी बॉन्डिंग एजंट, मॉडेलिंग वॅक्स आणि सॉफ्ट लायनरची खरेदी बोली क्र. **२०२६_बृमुंमपा_१३०६७३३_१** | ०९.०६.२०२६ | २२.०६.२०२६ |
| वेबसाईट: http://www.mahatenders.gov.in | | | |
| ई-मेल आयडी: cl02.nairdental@mcgm.gov.in | | | |

सही/-
अधिष्ठाता
पीआरओ/५१३/जाहि./२०२६-२७ **नायर रुग्णालय दंत महाविद्यालय**
स्वमर्जीने औषधोपचार करू नका

**सिडको**
शहरांचे शिल्पकार
**बोली मागविणारी सूचना**
**नवी मुंबईमधील सिडकोच्या कार्यक्षेत्राअंतर्गत विविध एसटीपी'स करिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी)च्या विविध अनुपालन बाबींचे प्रचालन आणि पूर्ण करण्याकरिता मंजुऱ्या मिळविण्याकरिता सल्लागार सेवा पुरविणे**
महाराष्ट्राची सिडको मर्यादीत खालील कामाकरिता कोणत्याही प्रकारच्या एसटीपीसाठी एमपीसीबी विभागाकडून स्थापना/प्रचालन प्रमाणपत्राकरिता मंजुरी मिळविलेल्या अनुभवी सल्लागारांकडून ई-टेंडरिंग प्रक्रियेद्वारे "ऑनलाईन" बाब दर शतमान बोली मागवित आहेत:
**१) कामाचे नाव: नवी मुंबईमधील सिडकोच्या कार्यक्षेत्राअंतर्गत विविध एसटीपी'स करिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी)च्या विविध अनुपालन बाबींचे प्रचालन आणि पूर्ण करण्याकरिता मंजुऱ्या मिळविण्याकरिता सल्लागार सेवा पुरविणे, २) सी. ए. क्र.:** ०२/सिडको/ईई(मलनि:सारण प्रकल्प)/२०२६-२७. **३) बोलीस लावण्यात आलेली किंमत:** रु. ३७,००,०००.०० (जीएसटी वगळता) **४) ई.एम.डी.:** रु. ३७,०००.०० (फक्त ऑनलाईन पेमेन्ट गेटवे माध्यमाद्वारे भरावे) **५) पूर्तता कालावधी:** ७३० (सातशे तीस) दिवस (पावसाळा समाविष्ट) **६) निविदा प्रक्रिया शुल्क:** रु. १,१८०/- (रुपये एक हजार एकशे ऐंशी मात्र) १८% जीएसटी समाविष्ट (ना-परतावा) फक्त ऑनलाईन पेमेन्ट गेटवे माध्यमाद्वारे भरावे).
बोली कार्यक्रमासह बोली प्रपत्रे दि. ११.०६.२०२६ रोजी १७.०१ वाजेपासून वेबसाईट **https://mahatenders.gov.in** वर उपलब्ध होतील.
**कार्यकारी अभियंता**
**(मलनि:सारण प्रकल्प)**
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०८१/२०२६-२७

# पीओपीच्या मूर्तीवरील बंदीची अंमलबजावणी तातडीने नको

**बृहन्मुंबई गणेशोत्सव समन्वय समितीची मागणी**

मुंबई

**पीओपी** अर्थात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीची अंमलबजावणी तातडीने केल्यास मूर्ती व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो कामगार बेरोजगार होणार आहेत. याचा मंडळांनाही मोठा फटका बसणार आहे. त्यामुळे 'पीओपी' मूर्ती बंदीची अंमलबजावणी तातडीने न करता मूर्तिकारांना किमान तीन ते पाच वर्षांचा संक्रमण कालावधी द्यावा, अशी मागणी बृहन्मुंबई गणेशोत्सव समन्वय समितीने पालिका आयुक्त आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी दिली.

नरेश दहिबावकर म्हणाले की, पीओपी बंदीची अंमलबजावणी तातडीने करू नका. असे केल्यास मूर्ती व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो कामगार बेरोजगार होणार आहेत. याचा मंडळांनाही मोठा फटका बसणार आहे. त्यामुळे 'पीओपी' मूर्ती बंदीची अंमलबजावणी तातडीने न करता मूर्तिकारांना किमान तीन ते पाच वर्षांचा संक्रमण कालावधी द्यावा. विसर्जनानंतर पीओपी अवशेषांचे १०० टक्के संकलन व पुनर्प्रक्रिया करावी. प्रत्येक विभागात स्वतंत्र संकलन व पुनर्प्रक्रिया केंद्रे स्थापन करावीत. मोठ्या सार्वजनिक गणेशमूर्तीसाठी स्वतंत्र व व्यवहार्य धोरण निश्चित करावे.

# बोरिवली-दहिसर रेल्वे विस्तार प्रकल्पासाठी ३४९ झाडे तोडली

मुंबई

**बोरिवली-दहिसर** रेल्वे विस्तार प्रकल्पात बाधित होणारी ३४९ झाडे वनविभागाची रीतसर परवानगी तोडली आली आहेत. आता या प्रकल्पाच्या विकासकामांना गती देण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तोडण्यात येणाऱ्या प्रत्येक झाडाच्या बदल्यात २९ नवी रोपे लावण्यात येणार आहेत, अशी घोषणा मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास गाडेकर यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केली. मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष विलास गाडेकर यांनी सांगितले की, नव्या रोपांची लागवड ही नियमानुसार १:२९ च्या प्रमाणात केली जाणार आहे.

# तळेगाव एमआयडीसीत गॅस गळती २ कामगारांचा गुदमरून मृत्यू

पुणे

**पुण्यातील** मावळ तालुक्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरातील एका औद्योगिक कंपनीत कार्बन डायऑक्साइड गॅसची गळती झाल्याने गणेश उंबरे आणि वैभव थोरात या दोन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. तर श्रीकृष्ण साहू, गौरीशंकर शर्मा आणि नरसिंह पाटील हे तिघे गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

तळेगाव एमआयडीसीतील कंपनीच्या एका विभागात नेहमीप्रमाणे काम सुरू होते. दुपारच्या सुमारास गॅस यंत्रणेतून अचानक मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड गॅसची गळती सुरू झाली. काही वेळातच परिसरातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याने कामगारांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. या गॅसगळतीच्या विळख्यात पाच कामगार सापडले. त्यापैकी गणेश उंबरे आणि वैभव थोरात हे दोघे जागीच बेशुद्ध पडले. शरीरात मोठ्या प्रमाणात वायू गेल्याने आणि पुरेसा ऑक्सिजन न मिळाल्याने त्यांचा गुदमरून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कंपनी परिसरात गोंधळ उडाला. आपत्कालीन अलार्म वाजवून विभाग रिकामा करण्यात आला.

# कुवेतमधील अफगाणिस्तानच्या दूतावासाचा ताबा तालिबानकडे

कुवेत

**कुवैतमधील** अफगाणिस्तानच्या दूतावासाचा ताबा तालिबान सरकारकडे सोपविण्यात आला आहे. या निर्णयामुळे आखाती देशांमध्ये तालिबानचे प्रतिनिधित्व अधिक बळकट झाल्याचे मानले जात आहे. शफीक खतीब यांची दूतावासाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून कुवेत आणि तालिबान प्रशासनामध्ये या संदर्भात चर्चा सुरू होती. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. कुवेतसह रशिया, चीन, इराण, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, ओमान आणि कतार यांसारख्या देशांनीही अफगाणदूतावासांना मान्यता दिली आहे. तालिबानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी मध्यपूर्वेतील अनेक देशांमध्ये अफगाण दूतावास कार्यरत असल्याचे सांगत याला महत्त्वाचे राजनैतिक यश म्हटले.

# दादरमध्ये पुन्हा वीजपुरवठा खंडीत

**मुंबई** - मागील काही दिवसांपासून मुंबईतील दादर, गिरगाव, भायखळा, ग्रँटरोड, लालबाग तर नवी मुंबईतील कामोठे परिसरात विजेचा लपंडाव सुरू आहे. आज सायंकाळी ८ वाजताच्या सुमारास दादर पश्चिम भागात शिवाजी पार्क ते कीर्ती कॉलेज परिसरात सुमारे पाऊण तास वीजपुरवठा खंडीत झाला होता. याबाबत बेस्ट अधिकाऱ्यांनी सांगितले की, कीर्ती कॉलेजजवळून वीज लाईन जाते. काही तांत्रिक कारणामुळे फीडर ट्रिप झाला होता. त्यामुळे या भागातील वीजपुरवठा अचानक बंद झाला. नंतर हा बिघाड दुरुस्त करण्यात आला. त्यामुळे त्या भागातील वीजपुरवठा पूर्ववत झाला. दरम्यान, मुंबईत उकाडा असह्य होत असताना वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# जपानच्या उत्सुनोमिया शहरात अस्वल

टोकियो **९४ शाळा बंद**

**जपानच्या** उत्सुनोमियामध्ये पहिल्यांदाच शहर परिसरात अस्वल दिसल्याने खळबळ उडाली. सुरक्षिततेच्या कारणास्तव प्रशासनाने तत्काळ कारवाई करत ९४ प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील वर्ग बंद केले आहेत. संपूर्ण परिसरात सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला असून वन्यजीव पथकाकडून शोधमोहीम सुरू आहे.

मागील तीन दिवसांपासून शहरातील निवासी परिसरात अस्वल दिसत होते. सुमारे ५ लाख लोकसंख्या असलेल्या या शहरात अशा प्रकारची ही पहिलीच घटना असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

वन्यजीव विभाग आणि स्थानिक प्रशासनाचे पथक या अस्वलाचा शोध घेत आहेत. एका माध्यमिक शाळेपासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर अस्वल दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने सर्व शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for procurement of 11 KV Heat Shrinkable Straight Through Jointing Kits and 11 KV Heat Shrinkable Outdoor/Indoor End Termination suitable for various sizes of H.T. XLPE Cables with Estimated Cost of Rs. 717.79 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-05/0626 due for submission on dtd. 30-06-2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 132/26 Chief Engineer (MMD)

# म्हाडाच्या धोकादायक इमारतीतील भाडेकरूंसाठी पर्यायी घरांची कमतरता

मुंबई

**म्हाडा** मुंबई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळाने ८२ अतिधोकादायक सेस इमारतींची यादी जाहीर केली आहे. यातील २१०२ भाडेकरूंची पावसाळ्यापूर्वी पर्यायी घरांची व्यवस्था म्हाडाला करावी लागणार आहे. मात्र म्हाडाकडे अंदाजे ५०० खोल्या उपलब्ध आहेत. भाडेकरूंची संख्या जास्त व घरांची कमतरता आहे.

दक्षिण मुंबईत या ८२ अतिधोकादायक इमारती आहेत. यामध्ये राहाणाऱ्या भाडेकरूंनी घरे रिकामी करून धारावी आणि बोरिवली गोराई येथे असलेल्या म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील खोल्यांमध्ये राहावयास जाण्याचे आवाहन या भाडेकरूंना म्हाडाने केले आहे. दक्षिण मुंबईतील रहिवासी उपनगरात राहावयास जाईल का? यावर प्रश्न चिन्ह आहे. या संदर्भात मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्याला विचारले असता त्यांनी वरील माहितीला दुजोरा देत असे सांगितले की, ज्या भाडेकरूंना संक्रमण शिबिरात खोल्या नको असतील तर ते दरमहा वीस हजार रुपये घराच्या भाड्याचा पर्याय निवडू शकतात.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निवीदा सुचना**

ई - नोदणीकृत शासकीय निमशासकीय नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून, ई - निवीदा कार्यकारी अभियंता (स्था) रत्नागिरी, ईटी-०४/२०२६-२७, ईटी-०५/ २०२६-२७, ईटी-०६/२०२६-२७ व ईटी - ०७/२०२६-२७ स्थापत्य कामासाठी मागविण्यात येत असून त्याबद्दलचा इतर सर्व सविस्तर तपशिल कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatAPP या वेबसाईटवर उपलब्ध असून, ई-निवीदा विक्री करणेचा कालावधी दि. १०.०६.२०२६ ते १७.०६.२०२६ सकाळी ११.०० पर्यत व निवीदा सादर करण्याची तारीख १७.०६.२०२६ रोजी दुपारी १३.०० पर्यत आहे. ई-निवीदा फी व ई-निवीदा बयाणा रक्कम ऑनलाईन माध्यमातून भरुन सर्व तपशीलांसह विहीत नमुन्यात ई-निवीदा सादर करावी. सदरील निवीदेत काही शुध्दीपत्रक असेल तर ते फक्त महावितरणच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संपर्क अधिकारी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) रत्नागिरी. दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२१७७ मो. नं. ७८७५७६५०१६.

PRO No.:- PRO/KZR/42/2026-27Dt. 08.06.2026

कार्यकारी अभियंता (स्था.) रत्नागिरी

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक १६/२०२६-२०२७ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्र... दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रातील मुंबई-गोवा महामार्गावरील 'सर्क्युलर ओव्हरलिफ्ट'ला जोडणाऱ्या मुख्य अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे. | २३९,९९,१६,६२६.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १७/०६/२०२६ ते दिनांक ०३/०८/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०१/०७/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १०/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# साहेब निर्णय घ्या! भुजबळ समर्थकांचे बॅनर

नाशिक




**राज्यसभा** पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राजेंद्र जैन यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांच्या नाराजीच्या चर्चांना उधाण आले असतानाच येवला शहर आणि तालुक्यात साहेब, निर्णय घ्या असे बॅनर झळकले आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी छगन भुजबळ इच्छुक होते. त्यांनी आपला पुतण्या माजी खासदार समीर भुजबळ यांना राज्य मंत्रिमंडळात स्थान मिळावे, अशी मागणी केली होती. पण पक्षश्रेष्ठींनी राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्यानंतर भुजबळ समर्थकांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे. भुजबळ यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या येवला मतदारसंघातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी हे बॅनर लावण्यात आले आहेत. बॅनरच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी भुजबळ यांच्यावरील निष्ठा व्यक्त करत त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**
**(सक्षम प्राधिकारी-१) यांचे कार्यालय**
एच.डी.आय.एल टॉवर ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१
संकेतस्थळ : www.sra.gov.in ईमेलः compauth1@sra.gov.in

**क्र. सप्रा-१/टे-१-प्र/कावि-१२८७/२६** **दिनांक: ०९/०६/२०२६**

**जाहिर नोटीस**

**श्रीम. अनिता बाळकृष्ण तळेकर**
**....अर्जदार**

**विरुध्द**

**श्री. पासी परदेशी**
**श्री. गणपत गोविंद कांगणे**
**....प्रतिवादी**

**प्रति,**
श्री. पासी परदेशी
श्री. गणपत गोविंद कांगणे
निर्मल नगर सह. गृह. संस्था,
सायन कोळीवाडा, मुंबई-३७.

सदर जाहिर नोटीसव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, अपिलार्थी श्रीम. अनिता बाळकृष्ण तळेकर, यांनी गृहनिर्माण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, ०१ ऑक्टोबर, २०२४ नुसार दि.०१/०१/२०११ पूर्वी निर्गमित परिशिष्ट-II मधील हस्तांतरीत झोपडीधारकांनी हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी करावयाचा अर्ज (अभय योजना) मधील जोडपत्र-एक नुसार मा. सक्षम प्राधिकारी - १ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एच.डी. आय. एल. टॉवर, ३ रा मजला अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ येथे निर्मल नगर सह. गृह. संस्थेचे मुळ परिशिष्ट-II अ.क्र. ९७१ वर आपले नावाऐवजी अर्जदार यांचे नाव पात्रतेकामी जोडपत्र दाखल केले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयात उक्त प्रकरणी दि. १३/०३/२०२६ सुनावणी निश्चित करण्यात आली होती. सदर सुनावणीस आपण गैरहजर असल्याने मा. सक्षम प्राधिकारी-१ यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसव्दारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८/०६/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी असून सदर जाहिर नोटीसीव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित सुनावणी दि.१८/०६/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता मा. सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, यांचे दालनात उपस्थित/ हजर राहून, आपली बाजू मांडावी, उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सागावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(प्रफुल्ल पाटील)**
**सहा. महसूल अधिकारी**
**सक्षम प्राधिकारी-१**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

**निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/२४२६/प्र.क्र.०३/१६८०/२०२६** **दिनांक: ०९/६/२०२६**

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/ निम शासकीय (Central Government/ State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-२ पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/CE/०४/२०२६-२७ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल (पुर्व), भुखंड क्र.२८, सेक्टर-११ मधील क्रिकेट मैदानावर नवीन हिरवळ लागवड करणे. (2nd Call). |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १०/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त - I**
**पनवेल महानगरपालिका**

# कल्याणमधील मराठी शाळा बंद! ६० विद्यार्थी अडचणीत

कल्याण

**नेतीवली** येथील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची प्रबोधनकार ठाकरे मराठी शाळा क्र.१९ ने ११ वी आणि १२ चे वर्ग बंद केल्याने दहावीची परीक्षा दिलेले ६० विद्यार्थी अडचणीत आले आहेत. त्यांना त्यांच्या गुणपत्रिका आणि शाळा सोडल्याचा दाखला अद्याप मिळालेला नाही.

पालकांची अशी तक्रार आहे की कडोंमनपाने किंवा शाळा व्यवस्थापनाने पर्यायी व्यवस्था न करताच ११ वी आणि १२ वीचे वर्ग अचानक बंद केले. वारंवार विचारणा करूनदेखील शाळा व्यवस्थापन दाद देत नाही. पालकांच्या प्रतिनिधी मंडळाने आधी माजी नगरसेवकांची भेट घेऊन त्यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर त्यांनी कडोंमनपाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांची भेट घेऊन रितसर तक्रार दिली.या तक्रारीची दखल घेत उपायुक्त बोरकर यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना बोलावून संबंधित विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आणि शाळा सोडल्याचे दाखले तत्काळ उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत.या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशही बोरकर यांनी दिले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत बोलताना एका पालकाने सांगितले की, मी मूळची उत्तर प्रदेशची आहे. तरीही मी माझ्या मुलाला मराठी शाळेत शिकवले.एकीकडे मराठी भाषा वाचवण्याची भाषा राजकारणी करतात आणि दुसरीकडे अशाप्रकारे मराठी शाळा बंद पडत आहेत. हे दुदैवी आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा जि.ठाणे.**
सहकार विद्याप्रसारक मंडळशाळेसमोर, जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, पीन - ४००६०५
Email_eemsddkalwa@yahoo.co.in Phone & Fax No. ०२२-२५३७४७७०

**ई-निविदा सुचना क्र. ०३ सन-२०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा B-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन बांधकाम विभाग, जळगांव यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.३७,६९,२०० /- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| २. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, ठाणे पाटबंधारे विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.३७,०८,०००/- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| ३. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) यांच्या कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा कालवे विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु. ६२,३१,६००/- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| ४. | कामाचे नांव | **मा. जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) यांच्या कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, पुणे सिंचन विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु. ५४,६१,२०० /- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक:- १०/०६/२०२६ ते दिनांक १७/०६/२०२६
निविदा उघडणे : दिनांक-:१९/०६/२०२६

जा.क्र.यांभांविवि/लेशा-२/१०७२ /२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे.
दिनांक :- ०३/०६/२०२६
क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १०५४

सही/-
**(सं.ना. रोकडे)**
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे

# नव्या महाविद्यालयांना मान्यतेचा मार्ग मोकळा

मुंबई

**राज्यातील** उच्च शिक्षण क्षेत्राला चालना देण्यासाठी मंत्रिमंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आज झालेल्या बैठकीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रस्तावानुसार करण्यात आलेल्या या बदलांमुळे नव्या महाविद्यालयांना मान्यता देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

या सुधारणांनुसार राज्यात नव्याने सुरू होणाऱ्या महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणे, विद्यमान महाविद्यालयांमध्ये नवीन विद्याशाखा सुरू करणे. तसेच नवीन अभ्यासक्रम, विषय आणि अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया सोपी करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरात अधिक शैक्षणिक पर्याय उपलब्ध होणार असून, उच्च शिक्षणाची संधी अधिक व्यापक होईल.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक आरोग्य विभाग
जाहिरात

ठाणे महानगरपालिका, ठाणे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाकडील स्त्री रोग तज्ञ संवर्गातील रिक्त पदे करारपध्दतीने भरावयाची असून त्याकरीता पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह खालील नमुद केलेल्या दिवशी थेट मुलाखतीसाठी सकाळी ११.०० वाजता वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, महापालिका भवन, ४ था मजला, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे ४००६०२ या पत्यावर संपूर्ण तपशिलासह उपस्थित रहावे.

| अ.क्रं. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मासिक मानधन | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्त्री-रोग तज्ञ | ११ | MBBS MD DNB (OBGY) किंवा MBBS DGO | MBBS MD DNB (OBGY) असल्यास रु. १,२५,०००/- किंवा MBBS DGO असल्यास रु.१,००,०००/- | दि. १७/०६/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत |

**वयोमर्यादा**:- शासनाच्या नियमानुसार (शासकिय नियमानुसार खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय (प्रवर्गासाठी ४३ वर्षे)

**टिप**:-
जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदामध्ये वाढ/कमी करण्याचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत.
१. विहीत नमुन्यातील अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर अर्जाची प्रिंट काढून भरुन मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
२. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्यात याव्यात. (जन्मतारीख, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्र व मार्कशिट, अनुभव आणि शासननिर्णयानुसार जातीचा दाखला)
३. अर्जामध्ये संपूर्ण नांव व पत्ता, जन्मतारीख, जात, पोटजात, शैक्षणिक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. तसेच अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो जोडावा.
४. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र व नोंदणी नुतनीकरण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
५. नेमणूकी संदर्भात ठाणे महानगरपालिकेने घतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.
६. ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातंर्गत सदरची पदे मानधनावर अस्तित्वात राहतील.
७. सदर उमेदवारांना महापालिका सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

सदरची जाहिरात ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/१७९/२०२६-२७
दि:०९.०६.२०२६
**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

नवा काळ
मुंबई । बुधवार
१० जून, २०२६
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## 'गव्हर्नर'ला सेन्सॉरची मंजुरी



**अभिनेते** मनोज बाजपेयी यांच्या मुख्य भूमिकेमुळे चर्चेत असलेल्या 'गव्हर्नर' या आगामी चित्रपटाला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने म्हणजेच सेन्सॉर बोर्डाने अधिकृत मंजुरी दिली आहे.

या राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमी लाभलेल्या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाकडून 'यूए १३+' प्रमाणपत्र देण्यात आले असून, चित्रपटाचा एकूण कालावधी १२२ मिनिटे इतका निश्चित करण्यात आला आहे. हा चित्रपट येत्या १२ जून २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाला मंजुरी देताना त्यातील काही संवेदनशील प्रसंगांमुळे पालकांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. तसेच नियमांनुसार आवश्यक असलेले बदल आणि काटछाट पूर्ण झाल्यानंतरच हे प्रमाणपत्र सुपूर्द केले आहे.

मात्र, चित्रपटामधून नेमके कोणते प्रसंग किंवा संवाद वगळण्यात आले आहेत, याची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## 'नो एंट्री'चा सिक्वेल येणारच; पण...



**'नो एंट्री'** या २००५ मधील लोकप्रिय ठरलेल्या चित्रपटाच्या सिक्वेलची म्हणजेच 'नो एंट्री २'ची प्रेक्षक बऱ्याच वर्षांपासून वाट पाहत आहेत. मात्र, या चित्रपटाच्या कामात सातत्याने विलंब होत असून, अनेक अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर चित्रपटाचे दिग्दर्शक अनीस बझ्मी यांनी अखेर मौन सोडले आहे. बझ्मी म्हणाले की, काही चित्रपटांची स्वतःची एक कुंडली असते आणि त्यांचा या गोष्टीवर पूर्ण विश्वास आहे. एखादा चित्रपट खूप लवकर तयार होतो, तर एखाद्या चित्रपटाला बनण्यासाठी बराच वेळ लागतो.

मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस यावा यासाठी संपूर्ण टीमकडून प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत, अशी ग्वाही त्यांनी दिली. मी या चित्रपटाची कथा अत्यंत मनापासून आणि आवडीने लिहिली असून, ही माझ्या सर्वोत्कृष्ट संहितांपैकी एक असल्याचा दावा त्यांनी केला आहे. बझ्मी स्वतः 'भूल भुलैया ३'च्या चित्रीकरणात आणि त्यानंतर अक्षय कुमारसोबतच्या एका नव्या प्रकल्पात व्यस्त झाल्यामुळे या चित्रपटाचे वेळापत्रक पुढे ढकलले गेले.

## 'ईथा' झळकणार ऑगस्टमध्ये!






**'छावा'** या ऐतिहासिक चित्रपटाच्या प्रचंड यशानंतर चित्रपट निर्माते दिनेश विजान आणि दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर ही जोडी पुन्हा एकदा एका नव्या भव्य चित्रपटासाठी एकत्र आली आहे. 'ईथा' असे या आगामी चित्रपटाचे नाव असून, यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

या बहुप्रतीक्षित बायोग्राफिकल ड्रामाची तारीख आता अधिकृतपणे जाहीर करण्यात आली असून, हा चित्रपट २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षाबंधनाच्या सुट्ट्यांच्या मुहूर्तावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेल्या आणि लावणी क्षेत्रातील दिग्गज कलावंत विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांच्या जीवनप्रवासावर हा चित्रपट आधारित आहे. श्रद्धा कपूर या चित्रपटात विठाबाईंची मुख्य भूमिका साकारत असून, तिची ही भूमिका अत्यंत आव्हानात्मक आणि भावनिक असणार आहे. या चित्रपटाला प्रसिद्ध संगीतकार जोडी अजय-अतुल यांचे संगीत लाभणार असल्याने प्रेक्षकांमध्ये याविषयी आतापासूनच मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

## उत्सुकता राजकुमारच्या 'प्रहार'ची




**प्रसिद्ध** निर्माते दिनेश विजान आणि अभिनेता राजकुमार राव हे दोघे पुन्हा एकदा एका मोठ्या चित्रपटासाठी एकत्र आले आहेत. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या आयुष्यावर आधारित हा चित्रपट असून, 'प्रहार-द उज्ज्वल निकम स्टोरी' असे या चित्रपटाचे नाव निश्चित करण्यात आले आहे. हा भव्य चित्रपट ७ ऑगस्ट २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

मॅडॉक फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माण होणाऱ्या या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक अविनाश अरुण यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या चित्रपटात राजकुमार राव मुख्य भूमिकेत म्हणजेच उज्ज्वल निकम यांची व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे. त्याच्यासोबत जयदीप अहलावत, वामिका गब्बी आणि सिकंदर खेर हे दिग्गज कलाकार देखील महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकणार आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेला कलाटणी देणारे खटले आणि जनमानसावर खोल प्रभाव पाडणाऱ्या घटनांभोवती या नाट्यमय चित्रपटाची कथा विणण्यात आली आहे.

## रणवीरच्या 'भूमिके'चे पूनमकडून कौतुक





**नव्या** पिढीतील आघाडीचा अभिनेता रणवीर सिंग याने 'डॉन ३' या बहुप्रतीक्षित चित्रपटातून अनपेक्षितपणे माघार घेतल्याने गेल्या काही दिवसांपासून चित्रपटसृष्टीत मोठी चर्चा रंगली आहे. या सर्व वादाच्या पार्श्वभूमीवर, सिने अँड टीव्ही आर्टिस्ट्स असोसिएशनच्या अध्यक्षा आणि ज्येष्ठ अभिनेत्री पूनम धिल्लन यांनी रणवीर सिंगचे जाहीर कौतुक केले आहे.

चित्रपटातून बाहेर पडल्यानंतर रणवीरने दाखवलेली व्यावसायिक प्रगल्भता आणि निर्मात्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी घेतलेले निर्णय अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

रणवीरने 'डॉन ३' मधून बाजूला झाल्यावर केवळ आपली सायनिंग अमाऊंट (करार रक्कम) निर्मात्यांना परत केली नाही, तर त्याच्या या निर्णयामुळे निर्मात्यांचे जे काही आर्थिक नुकसान झाले, त्याची भरपाई देण्याची तयारीही दर्शवली. पूनम धिल्लन म्हणाल्या, रणवीरने दाखवलेल्या या प्रामाणिकपणाबद्दल आणि व्यावसायिक नैतिकतेबद्दल त्याचे कौतुक करावे तितके थोडे आहे. चित्रपट सोडल्यानंतर नुकसान भरपाई देणे आणि सायनिंग अमाऊंट परत करणे ही मोठी गोष्ट आहे; आजकाल अनेक जण असे करतही नाहीत. चित्रपट क्षेत्रातील कलाकार आणि निर्माते यांच्यातील वादांवरही त्यांनी 'सिंटा'ची भूमिका स्पष्ट केली.

## हिनाचा कडक इशारा



**अभिनेत्री** हिना खान हिने सोशल मीडियावर द्वेष पसरवणाऱ्या आणि इतर कलाकारांना ट्रोल करणाऱ्यांना एक कडक इशारा दिला असून, आपल्या चाहत्यांना संयम आणि सभ्यता बाळगण्याचे आवाहन केले आहे. माझे चाहते कोणावर आक्षेपार्ह भाषेत टीका करत असतील किंवा ट्रोल करत असतील, तर ती त्यांना थेट ब्लॉक करेल, असे तिने स्पष्ट शब्दांत बजावले आहे. हा संपूर्ण वाद अभिनेत्री शिल्पा शिंदे हिच्या एका पॉडकास्टवरील विधानानंतर सुरू झाला होता. शिल्पाने 'भाभीजी घर पर हैं' या मालिकेच्या निर्मात्यांवर केलेले जुने आरोप खोटे असल्याचे म्हटल्यानंतर सोशल मीडियावर उलटसुलट चर्चा सुरू झाली. त्यानंतर हिना खान आणि शिल्पा शिंदे यांनी एकमेकांचे नाव न घेता काही सूचक पोस्ट शेअर केल्या होत्या. यामुळे दोन्ही बाजूंच्या चाहत्यांमध्ये सोशल मीडियावर जोरदार वाद पेटला. या वाढत्या वादावर पडदा टाकण्यासाठी हिनाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक सविस्तर पत्र लिहून चाहत्यांना शांततेचे आवाहन केले आहे.

## रक्त सांडू, पण शक्तिपीठ होऊ देणार नाही! कोल्हापुरात आंदोलन

■ कोल्हापूर

**राज्य** सरकारच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधात आज कोल्हापुरात हजारो शेतकरी, महिला आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढला. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी 'आमचे रक्त सांडले तरी चालेल, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही,' असा आक्रमक निर्धार व्यक्त करत सरकारविरोधात संताप व्यक्त केला.

या मोर्चात काँग्रेस नेते सतेज पाटील, शेतकरी नेते राजू शेट्टी तसेच छत्रपती शाहू महाराज सहभागी झाले होते. मोर्चात ग्रामीण भागातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. आंदोलनात सहभागी महिलांनी सांगितले की, शेती हीच आमची उपजीविका असून, जमीन गेल्यानंतर मुलाबाळांचे शिक्षण, विवाह आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता धोक्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प स्वीकारला जाणार नाही. मोर्चात बोलताना सतेज पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना नको असलेला प्रकल्प जबरदस्तीने राबवू नये. आधीच नागपूर-रत्नागिरी मार्गासारखे पर्याय उपलब्ध असताना नव्या महामार्गाची गरज काय?

## मुंबईतील पाणी टँकर संघटनेचा संप अखेर मागे

■ मुंबई

**मुंबईतील** खासगी पाणी टँकर संघटनेने पुकारलेला बेमुदत संप अखेर मागे घेतल्याने मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्हाधिकारी यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर संघटनेने हा निर्णय घेतला. त्यामुळे पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली चिंता तात्पुरती दूर झाली असून, शहरातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत सुरू राहणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील साठा केवळ १३ टक्क्यांवर आल्याने महापालिकेने १० टक्के पाणी कपात लागू केली आहे. त्यातच खासगी केंद्रिय भूजल प्राधिकरणाची परवानगी अनिवार्य केल्याच्या विरोधात मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने कालपासून बेमुदत संप सुरू केला होता. यामुळे विविध व्यावसायिक आस्थापनांपुढे पाणीपुरवठ्याचे संकट उभे राहिले होते.

## जनगणनेत ओबीसी कॉलम नसल्यास जेलभरो आंदोलन

### वडेट्टीवारांचा इशारा

■ मुंबई



**जनगणनेमध्ये** सरकारने ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम दिला नाही आणि माहिती न दिल्यास गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला, तर आम्ही सर्व ओबीसी एकत्र येऊन जेलभरो आंदोलन करू, असा इशारा काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी दिला.

वडेट्टीवार म्हणाले की, सरकारला ओबीसींची स्वतंत्र जनगणना करायची नाही. यामागचे कारण काय आहे, हे स्पष्ट नाही. कदाचित ओबीसींची खरी संख्या समोर आली, तर त्या प्रमाणात हक्क आणि वाटा द्यावा लागेल, अशी भीती सरकारला वाटत असावी. देशाची आर्थिक परिस्थिती खालावली असून, आम्हाला लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व क्षेत्रांत योग्य वाटा मिळायला हवा. आम्ही सरकारच्या कुणाच्या बापाचे बांधलेले नाही. ओबीसींचा स्वतंत्र कॉलम ठेवला तरच आम्ही जनगणनेला सहकार्य करू. सरकारला आमच्यावर गुन्हे दाखल करायचे असतील, तर त्यांनी तसे करावे. आम्ही त्यासाठीही तयार आहोत. सध्या जनगणनेची पहिली फेरी संपत आली असून, दुसऱ्या फेरीत ओबीसी कॉलम समाविष्ट केला जाईल. मात्र, भारत सरकार हे पाऊल उचलणार नाही. सरकार ओबीसींची खरी संख्या समोर येऊ देणार नाही.



पावसाळा जवळ येत असल्याच्या पार्श्वभूमीवर, टॉरंट पॉवर लिमिटेडने जनहितार्थ एक महत्त्वाची सुरक्षा सूचना जारी केली आहे. नागरिकांनी अनधिकृत विजेचा वापर पूर्णपणे थांबवावा आणि केवळ कायदेशीर व मीटर असलेल्या वीज जोडणीचाच वापर करावा, असे आवाहन कंपनीने केले आहे.

## प्रकाशगड येथे महानिर्मितीचा २१वा वर्धापन दिन उत्साहात

■ मुंबई



**मुंबईतील** प्रकाशगड मुख्यालयात महानिर्मितीचा २१वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. राज्याच्या वाढत्या विजेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यक्षमता वाढवणे, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात महानिर्मितीच्या गेल्या दोन दशकांतील यशस्वी वाटचालीचा आढावा घेण्यात आला. वर्धापन दिन कार्यक्रमात अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांनी राज्याच्या वाढत्या वीज गरजा पूर्ण करण्यासाठी महानिर्मितीने अधिक कार्यक्षम आणि तंत्रसज्ज होण्याची आवश्यकता व्यक्त केली. तर स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी स्पर्धात्मकता आणि आर्थिक शिस्त बळकट करण्यावर भर दिला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आणि वीज निर्मिती संचांचा गौरव करण्यात आला. राज्यभरातील अधिकारी-कर्मचारी प्रत्यक्ष तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले. 'यशोगाथा-२०२६' या चित्रफितीद्वारे महानिर्मितीच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा सादर करण्यात आला.

## नीट पेपरफुटी प्रकरणात मनीषा वाघमारेला जामीन नाही

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** राऊज ॲव्हेन्यू न्यायालयाने नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या मनीषा वाघमारेचा जामीन अर्ज फेटाळला. जामीन अर्जावर आज झालेल्या सुनावणीत मनीषा वाघमारेच्या वकिलांनी ती एक प्रमाणित शिक्षण समुपदेशक (एज्युकेशन कौन्सिलर) असल्याचा युक्तिवाद केला. समुपदेशनातून त्यांना नियमित मानधन मिळत असल्याचे सांगितले.

वाघमारे हिच्या बँक खात्यात संशयास्पद रक्कम जमा झाल्याचा कोणताही ठोस पुरावा नाही. सीबीआयने त्यांच्या घराची झडती घेतली असताना कोणतीही रोकड किंवा आक्षेपार्ह साहित्य आढळून आले नसल्याचेही तिच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. जामीन अर्जाला विरोध करताना सीबीआयने गंभीर आरोप केले.

वाघमारे या स्वतःला प्रमाणित शिक्षिका म्हणवत असली तरी ती ब्युटीपार्लरही चालवत असल्याचा दावा तपास यंत्रणेने केला. तिने रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र विषयांचे प्रश्न पुरविले आणि त्यानंतर ते प्रश्न शुभमपर्यंत पोहोचल्याचे सीबीआयने न्यायालयाला सांगितले.

## निवडणुकीत मतफुटी रोखण्यासाठी भाजपाच्या नगरसेवकांना गोवा सहल

■ नागपूर

**विधान** परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुकीत भाजपाची मते फुटू नयेत म्हणजे क्रॉसव्होटिंग रोखण्यासाठी आणि पक्षाचे सर्व नगरसेवक एकत्र राहावेत, यासाठी भाजपाने योजना आखली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून भाजपा नागपूर महानगरपालिकेतील आपल्या सर्व नगरसेवकांना तब्बल तीन दिवस गोव्याला नेणार असल्याची खात्रीशीर माहिती आहे. यासाठी 'टूर प्लॅन' निश्चित करण्यात आला आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. राजीव पोतदार आणि काँग्रेसचे अतुल लोंढे यांच्यात लढत होत आहे. ही लढत कमालीची चुरशीची ठरण्याची शक्यता आहे. नागपूर महानगरपालिकेत भाजपाचे स्पष्ट संख्याबळ असेल. मात्र काँग्रेस नेत्यांनी 'क्रॉसव्होटिंग' होणार असल्याचा दावा केला आहे. काँग्रेसचा हा दावा खोडून काढण्यासाठी आणि आपले संख्याबळ एकत्र ठेवण्यासाठी भाजपाने 'मिशन नागपूर' अंतर्गत सर्व नगरसेवकांना नागपूरबाहेर नेण्याची योजना आखली आहे. यासाठी १० जूनपासून ते थेट मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजेच १७ जूनपर्यंत नगरसेवकांना नागपूरबाहेर ठेवले जाणार आहे.

नगरसेवकांना आधी मुंबईतील 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी' येथे नेले जाणार आहे. तिथे पक्ष संघटन, प्रशासन आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत मार्गदर्शन करण्याचा उद्देश असल्याचे भाजपाकडून सांगण्यात येत आहे. मतदानाच्या अवघे काही दिवस आधी आयोजित केलेला हा अभ्यासवर्ग आणि त्यानंतरचा गोवा दौरा यामुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

## हिंगोलीमध्ये उबाठाचे महागाईविरोधात आंदोलन

■ हिंगोली

**वाढत्या** महागाईविरोधात हिंगोलीत उबाठाच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. हिंगोलीतील महात्मा गांधी चौकात रस्त्यावर स्वयंपाक करत आंदोलकांनी अनोख्या पद्धतीने सरकारचा निषेध नोंदवला. केंद्र आणि राज्य सरकारने 'अच्छे दिन'चे खोटे आश्वासन देत जनतेला महागाईच्या खाईत लोटल्याचा आरोप यावेळी उबाठाकडून करण्यात आला.

जीवनावश्यक वस्तूंच्या सतत वाढणाऱ्या किमती, घरगुती गॅस दरवाढ, तसेच शेतकरी आणि युवकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या सर्व मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.


## आयुष्मान भारत डिजिटल मिशनला गती रायगडमध्ये मॉडेल जिल्हा उपक्रम सुरू

■ रायगड



**आयुष्मान** भारत डिजिटल मिशनला गती देण्यासाठी रायगड जिल्ह्याची 'मॉडेल जिल्हा' म्हणून निवड करण्यात आली आहे. पनवेल येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन करून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, भविष्यात राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही रायगडचे मॉडेल मार्गदर्शक ठरणार आहे. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनीलकुमार बर्नवाल यांनी आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा देण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. रायगडमधील प्रत्येक नागरिकापर्यंत या सुविधांचा लाभ पोहोचवण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# नवाकाळ शब्दकोडे-१६३२



**आडवे शब्द –**

१. अरण्य ३. डागाळलेला ६. खूप बोलणारा ९. संपत्ती ११. झोपडी १३. खटला १५. बारापैकी दुसरी रास १७. स्वामी, धनी १८. दमयंतीचा पती २०. साचेबंद, एकाच पठडीतले २२. वाहनांची ये-जा, वाहतूक २३. पाणी प्यायचे भांडे २५. नेहमी, नित्य २७. दात २८. ताबडतोब ३०. ओळख ३३. एक औषधी पदार्थ, वचा ३६. स्वच्छ ३८. रामाचे स्तोत्र ४०. लांब पल्ल्याची तलवार ४२. लग्न जुळण्यासाठी ग्रहांची अनुकूलता ४४. बोटाच्या टोकाकडचा कडक भाग ४५. सावली, छाया ४६. आर्जवे ४७. कट्टर मतांचा ४९. घळ, गुंफा ५०. जीन, पलाण ५१. सोहळा, कार्यक्रम ५३. पिराचा उत्सव, जत्रा ५५. पार्वती ५७. हाडांच्या पोकळीतला पदार्थ, बोन मॅरो ५९. चोपडी ६०. हेम, सोने ६१. मारुतीचे शस्त्र ६३. वडिलांच्या वयाचा, ज्येष्ठ ६४. वक्र ६६. पिपासा ६८. प्रसिद्ध अभिनेत्री xx लागू ७०. आवरण, वेष्टन ७१. उत्कट इच्छा ७३. भोवती कडी असलेला ग्रह ७५. सूर्य ७७. ऊर, छाती ७९. कुंपण ८०. श्रीकृष्ण ८१. गायन, गीत ८२. चंद्र, सोम ८४. आवडलेला, स्वीकारलेला ८५. खिडकी ८७. अतिशय वेगात ९०. ताजा, प्रफुल्लित ९२. जाडसर दळलेले गहू ९३. रमलेला ९४. शासनकर्ता, सत्तेवर असलेला ९६. दिमाख ९८. खिडकीची काच १०१. गोठ्याचे दार १०३. जवळचे संबंध, सोयरीक १०४. लोभस, मोहक १०५. नारळ व कोकम वापरून केलेला पदार्थ १०७. आवेश १०९. निशिगंध ११०. केवळ १११. लागून असलेले, शेजारी ११२. चातुर्य, शहाणपण ११३. सुंदर

**उभे शब्द –**

१. मुळाक्षरे २. सापाचा शत्रू, मुंगूस ४. इंग्लंडची राजधानी ५. तेव्हा ७. पद्धत, प्रथा ८. इतराजी, नाराजी १०. पटल १२. फर्निचरचे भक्कम लाकूड, टिंबर १४. वाणी १५. उतारवय १६. रामाचा एक भाऊ १९. रोगप्रतिबंधक औषध २१. धनुष्य २३. पोशाख २४. छळ, त्रास २६. हक्क सांगणारा २९. घोडेस्वाराची पाय ठेवायची जागा ३०. उद्यानंतरचा दिवस ३१. तीन आसनी प्रवासी वाहन ३२. याग, यज्ञ ३४. धमक्या देऊन द्रव्य उकळणारा ३५. बैलाच्या मानेवरचा उंचवटा ३६अ. अंतःकरण ३७. अतिशय मोठा लाभ ३९. सिंहासन, तख्त ४१. पुष्परस, मकरंद ४२. पुडाची वडी ४३. एक शेंगभाजी, बावच्या ४६. महालाचे प्रशासन बघणारा अधिकारी ४८. सरहद्द; मुलींचे एक नाव ५१. स्वाक्षरी ५२. मन रिझवणारे, आनंद देणारा ५३. श्रावण महिन्यातील शेवटचा शनिवार ५४. छोटा, बारीक ५६. ज्यूटचे कापड ५८. मेणा, डोली ५९. डुक्कर ६२. कक्ष, हॉल, मोठी खोली ६३. धनादेशाची रक्कम रोख घेणे किंवा खात्यात जमा करणे ६४. गंध; दरवळ ६५. डाकू, दरोडेखोर ६७. नुकसान ६९. कुरघोडी ७२. आजार, रोग ७४. बांधून ठेवणारी गोष्ट, पाश ७६. खोदकामासाठी असलेली कांब ७८. हवेत तरंगणारी गोष्ट ७९. नव्या पालवीचा ऋतू ८०. जननी, आई ८१. नगर, पुर ८३. पराक्रमी ८४. स्वच्छ धुवून इस्त्री करून आणलेला पोशाख ८६. जोशात, आवेशाने ८७. मोडलेले ८८. भीती, भय ८९. पायाने केलेला प्रहार ९१. त्याप्रमाणे ९३. मनमुराद, यथेच्छ ९४. घरात वापरण्याच्या चपला, स्लिपर्स ९५. दोरा, सूत्र ९७. दडपण ९९. धार्मिक व्रत १००. सर्व १०२. साडीचा पदर १०६. रास १०८. अंकित, अधीन १०९. गुणवत्ताधारक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३१ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. काजवा ४. कांता ५. खैर ७. सरोवर १०. तुफान ११. सबब १३. सराफकट्टा १५. सुख १६. लाल १७. वरात १८. हरहुन्नरी २०. कलागत २४. अळू २५. पर्ण २६. खरीप २८. पायजमा २९. वारेमाप ३१. पागनीस ३३. रंक ३५. पसा ३७. वठार ३९. रखडपट्टी ४०. ताक ४१. मोहरी ४३. शम ४४. बक्षीस ४५. तूर ४६. विसार ४८. भुयार ४९. लंगर ५०. पाडा ५१. कडोसरी ५३. सांजा ५४. विसंगत ५५. अकरा ५८. ईहा ५९. पेज ६०. सवे ६१. स्वेटर ६२. भलता ६३. यम ६५. बरकत ६८. कावळा ६९. हताश ७०. कुरड्या ७१. गाजरगवत ७३. समूह ७६. वाचीवीर ७८. पळ ७९. कापड ८०. लकेर ८२. मास ८४. धार ८५. पण ८६. कंठी ८७. पारावार ९०. घूमजाव ९२. खोड ९३. थाप ९४. कातळ ९५. सुरंगी ९६. मरण ९७. जिरेसाळ ९८. वाढवेळ १००. झणी १०१. सतावणे १०२. मातबरी १०३. टांगा १०४. पंथ

**उभे शब्द :** १. अतुल्य २. कानवला ३. वासलात ४. कांब ५. खैरात ६. रफ ७. सट्टा ८. वजीर ९. वैखरी १२. बल १३. सराटा १४. कड १५. सुन्न १८. हळू १९. हुजरेगिरी २०. कर्ण २१. गणग २२. दरी २३. पायउतार २४. अमाप २५. परवशता २६. खसखस २७. परंपरागत ३०. पडसे ३१. पार ३२. नीर क्षीर विवेक ३४. कट्टी ३६. सामोसा ३८. ठाम ४२. हरक ४४. बया ४६. विडा ४७. असहायता ४८. भुजा ४९. लंगडा ५०. पारा ५२. डोई ५३. सांज ५५. अटकाव ५६. करवतकाठी ५७. बालचमू ५९. पेठा ६०. सरड्याची धाव ६४. मशक ६५. बरवा ६६. तगार ६७. सरपण ७२. गळ ७३. सडपातळ ७४. हलवा ७५. घामाघूम ७७. वीर ८१. केरसुणी ८३. समरस ८५. पडसाद ८६. कंपवात ८८. राळ ८९. भगीरथ ९१. जाणता ९२. खोरे ९४. कावेरी ९७. जिणे ९९. ढब १००. झगा

## पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली आज एनडीएशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक

पान १ वरून- विविध योजना आणि धोरणांच्या अंमलबजावणीचा आढावा, 'विकसित भारत' अभियानाचा पुढील आराखडा तसेच पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि पुरवठा साखळीवर होणारा परिणाम या मुद्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीत केंद्र व राज्य सरकारांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेतला जाणार आहे. विविध राज्यांतील यशस्वी उपक्रम आणि सर्वोत्तम कार्यपद्धतींची देवाणघेवाणही होणार आहे. सध्या इंधन व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती तसेच महागाईबाबत चिंता व्यक्त केली जात असताना ही बैठक होत आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीवरही चर्चा होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीनंतर पंतप्रधान मोदी नीती गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीचेही अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

## राज्यसभेसाठी राष्ट्रवादीत या, पण अट मान्य नव्हती! नवनीत राणांचा खुलासा



■ मुंबई

**राज्यसभेच्या** उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची अट घालण्यात आली होती. मात्र ती आपल्याला मान्य नसल्याचा दावा भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यसभेच्या जागेसाठी नवनीत राणा यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. यासाठी त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने त्यांची खासदारकी जवळपास निश्चित मानली जात होती. मात्र अखेर राष्ट्रवादी काँग्रेसने उद्योगपती राजेंद्र जैन यांना उमेदवारी जाहीर केली आणि चर्चांना पूर्णविराम मिळाला.

नवनीत राणा म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षाची मी प्रामाणिक व निष्ठावान कार्यकर्ता आहे. कोणत्याही पदासाठी मी माझी विचारधारा बदलणार नाही. मी सदैव भारतीय जनता पक्षासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहीन. सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी मला राज्यसभेवर पाठवण्याबाबत इच्छा व्यक्त केली होती. माझ्या कार्यक्षमतेवर विश्वास दाखवत त्यांनी माझा विचार केला, याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. मात्र, राज्यसभेची उमेदवारी स्वीकारण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची अट मला मान्य नव्हती. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मी सुनेत्रा पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राज्यसभेची जागा भारतीय जनता पक्षाला सोडण्याची विनंती केली होती. परंतु काही कारणास्तव ते शक्य झाले नाही.

## २ पोलिसांना कारची धडक उद्योजकाचा जामीन नाकारला

**आरोपीवर ३१ गुन्ह्यांची नोंद**

■ मुंबई

**वांद्रे** (पूर्व) येथे ४ मे रोजी आपले कर्तव्य बजावत असताना दोन पोलीस अधिकाऱ्यांना गाडीची धडक देऊन जखमी केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या उद्योजकाला सत्र न्यायालयाने जामीन नाकारला आहे. यावेळी या आरोपीवर यापूर्वी वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याचे ३१ गुन्हे केले असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

वांद्रे (पूर्व) येथील कलानगर पुलाच्या उतरणीवर ४ मे रोजी रात्री सुमारे १२ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास पोलिसांची नाकाबंदी सुरू होती. त्यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या कारला थांबण्याचा इशारा करण्यात आला होता. मात्र, चालकाने गाडी थांबवण्याऐवजी पोलिसांच्या दुचाकीला धडक दिली. यात दोन पोलीस अधिकारी जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांनी अंधेरी पश्चिम येथे राहणाऱ्या कार चालक आरोपी परमीत सिंह हरचरण भरारा या उद्योजकाला अटक केली. या खटल्याच्या सुनावणीवेळी आरोपीवर यापूर्वी वाहन कायद्याच्या उल्लंघनाचे ३१ गुन्हे दाखल असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

## चेंबूरच्या दरड प्रवण भागामध्ये पालिका संरक्षक भिंत उभारणार

**पालिका ४.४६ कोटी रुपये खर्च करणार**

■ मुंबई

**चेंबूरच्या** वाशी नाका परिसरातील दरड प्रवण क्षेत्रात रहिवाशांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंत बांधण्यात येणार आहे. यामुळे या भागातील ४०० हून अधिक कुटुंबे सुरक्षित राहणार असून, पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका टळण्याची शक्यता आहे. मुंबई पालिकेने या प्रकल्पासाठी ४ कोटी ४६ लाख २७ हजार ६५७ खर्चाला मंजुरी दिली आहे. चेंबूरमधील वाशी नाका, भारत नगर आणि आजूबाजूच्या टेकड्या दरड प्रवण क्षेत्रात मोडतात. अशा पाच ते सहा ठिकाणी या प्रकल्पांतर्गत टेकडीच्या उतारालगत मजबूत आरसीसी सुरक्षा भिंत उभारण्यात येणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात दगड किंवा माती खाली घसरून येण्याच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे. यासाठी ४ कोटी ४६ रुपयांचा खर्च अपेक्षित असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू केले जाईल. या ठिकाणच्या शिंदे शिवसेनेच्या नगरसेविका अंजली नाईक म्हणाल्या की, वाशी नाका परिसरातील हा भाग अनेक वर्षांपासून दरडप्रवण म्हणून ओळखला जातो. स्थानिक रहिवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने येथे संरक्षण भिंत उभारण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती.अखेर पालिका प्रशासनाने या मागणीची दखल घेत प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.

## कॉकरोच पार्टी विरोधात 'इश्क करो पार्टी'ची स्थापना

पान १ वरून – राजकारणाला पर्याय म्हणून प्रेम, बंधुभाव आणि मानवी नातेसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पक्ष स्थापन करण्यात आला आहे. पक्षाचा अधिकृत जाहीरनामा मात्र अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेला नाही. अलीकडेच या संघटनेने कथित काटजू यांनी एक्सवरील आणखी एका पोस्टमध्ये भारतीय तरुणांना उद्देशून म्हटले आहे की, कॉकरोचविषयीच्या निरर्थक चर्चा विसरा आणि 'इश्क करो पार्टी'त सामील व्हा. सध्या 'इश्क करो पार्टी' ची उपस्थिती प्रामुख्याने सोशल मीडिया आणि ऑनलाईन चर्चांपुरतीच मर्यादित दिसत आहे. पक्षाची संघटनात्मक रचना, पदाधिकारी किंवा निवडणूक लढवण्याची रणनीती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, पक्षाची वेबसाईट आणि सोशल मीडिया खाते तयार करण्याचे काम सुरू असल्याचे संकेत काटजू यांनी दिले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका पोस्टमध्ये त्यांनी ज्येष्ठ लेखिका व पत्रकार मृणाल पांडे यांनाही पक्षात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. त्यांच्या घोषणेनंतर सोशल मीडियावर मीम्स आणि प्रतिक्रियांचा पूर आला. काटजू यांच्या घोषणेनंतर सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी सध्याच्या तणावपूर्ण राजकीय वातावरणात हा सकारात्मक आणि हलकाफुलका संदेश असल्याचे म्हटले आहे. तर काहींनी हा पक्ष प्रत्यक्ष राजकारणात उतरणार की, केवळ सोशल मीडियापुरताच राहणार, असा प्रश्न उपस्थित केला आहे. काहींनी विनोदी शैलीत 'एकतर्फी प्रेम करणाऱ्यांनाही सदस्यत्व मिळेल का?' अशी विचारणा केली, तर अनेकांनी पक्षाचा जाहीरनामा जाहीर करण्याची मागणी केली. मार्कंडेय काटजू हे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आहेत. २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. ते सप्टेंबर २०११ मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतर प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले. अनेकदा वादग्रस्त विधानांसाठी ते प्रसिद्ध आहेत. त्यांचे वडील एस. एन. काटजू हे अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायाधीश होते.

## महाराष्ट्र जीएसटी सुधारणा विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ मुंबई

**राज्यातील** करप्रणाली अधिक सुसूत्र आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (एमजीएसटी) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. वित्त विभागाच्या प्रस्तावानुसार हा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय वस्तू व सेवा कर (सीजीएसटी) अधिनियम, २०१७ मधील तरतुदींशी सुसंगती राखण्यासाठी राज्याच्या कायद्यात आवश्यक बदल करण्यात येणार आहेत. याच अनुषंगाने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६ मध्येही सुधारणा करण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्य आणि केंद्राच्या जीएसटी कायद्यांमधील एकरूपता वाढण्यास मदत होणार असून करप्रणाली अधिक सुसंगत, पारदर्शक आणि परिणामकारक बनण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सरकारची एक आठवड्यात दुसरी कर्जमाफी योजना

पान १ वरून

कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हेच निकष पूर्वीच्या वंचित शेतकऱ्यांनाही लागू होण्याची शक्यता व्यक्त आहे. या निर्णयानंतर सर्वांचे लक्ष अंमलबजावणीच्या प्रक्रियेवर लागले आहे. मागील योजनांमध्ये काही कठोर अटींमुळे अनेक शेतकरी वंचित राहिल्याने यावेळी सरकार प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक ठेवणार का, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण आणि सहकारी बँकांशी समन्वय साधण्यासाठी वित्त व सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वतंत्र समिती स्थापन केली करणार आहे. बँकांकडील अनुत्पादित कर्जांचा तपशील पाहून ठराविक टक्केवारीनुसार सवलत देऊन रक्कम निश्चित केली जाईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक प्लॅटफॉर्मवर नोंदणी करणेही आवश्यक असेल. यासाठी अद्ययावत ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात येणार आहे, ज्याद्वारे संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. या कर्जमाफीबाबत कृषीमंत्री दत्ता भरणे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मागील दोन कर्जमाफी योजनांमध्ये लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानायला हवेत. राज्य सरकारची आर्थिक स्थिती सध्या तितकीशी चांगली नसली तरी शेतकरी मोठ्या अडचणीत आहे. गारपीट, अतिवृष्टी, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन घटले आहे आणि पिकांना योग्य बाजारभावही मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत करणे आवश्यक असल्याची भावना ठेवून मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेतल्यानंतर सर्वांचे पूर्ण समाधान होणार नाही, हेही वास्तव आहे.

मात्र जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळावा, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी विविध स्तरांवर समित्या स्थापन करण्यात आल्या असून, शेतकऱ्यांकडून येणाऱ्या सूचनांचाही विचार केला जात आहे. २०१९ च्या कर्जमाफीच्या वेळी काही शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला होता. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकऱ्याकडे २ लाख ५० हजार रुपयांचे कर्ज असेल, तर त्याला २ लाख रुपयांची कर्जमाफी मिळाली नाही आणि तो थकबाकीत राहिला. मात्र आता नव्या निकषांनुसार, जर एखाद्या शेतकऱ्याने २ लाख ७० हजार रुपयांचे कर्ज घेतले असेल आणि त्याने उर्वरित ७० हजार रुपये भरले, तर उरलेले २ लाख रुपये सरकारकडून कर्जमाफी म्हणून दिले जातील.

या कर्जमाफीवर प्रतिक्रिया देताना किसान सभेचे अजित नवले म्हणाले की, किसान सभेच्या वतीने आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो. २०१७ पूर्वीचे काही शेतकरी विविध कारणांमुळे वंचित राहिले होते आणि त्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नव्हता. त्यामुळे त्यांना न्याय देण्याची खरी गरज असून, याबाबतही सरकारने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. मात्र २०१९ मधील काही पात्र शेतकऱ्यांना यावेळी डावलण्यात आले आहे. त्या निर्णयाचादेखील पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.


SBI
**भारतीय स्टेट बँक**
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०७४२७८७९ | जयमोहन एस. | १६७२ | ६२२७९५१ | ६२२७९५१ | ८०१६६४०४५८ | ८०१६६४२१२९ |
| २ | ०१०१९४६१ | शिमला रानी चमन लाल सिंघल | ४००० | १०९०४५ | १०९०४५ | ७३९९९९९२७१ | ७४००००३२७० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** १०.०६.२०२६
समभागांची संख्या: **५६७२**
स.प्रमाणपत्रांची संख्या: **२**
महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)



**जाहीर सूचना**
**पराक्कोट इन्व्हेस्टमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
नोंद. कार्यालय: सी-२०६, घाटकोपर औद्योगिक वसाहत, एल.बी.एस. मार्ग, ॲनासिन कंपनी जवळ, घाटकोपर (पश्चिम), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००८६

**ई-लिलाव जाहीर घोषणा तारीख – १० जून २०२६**
**पराक्कोट इन्व्हेस्टमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात) यांच्या मालमत्तेच्या लिलावासाठी, स्वतंत्र स्वरूपात, जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे आणि कोणत्याही प्रकारच्या दायित्वाशिवाय या अटींवर, नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ (संहिता) अंतर्गत मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (एनसीएलटी) यांनी दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार.**
**ई-लिलावाची तारीख – ०६ जुलै २०२६, दुपारी २:०० ते ४:०० वाजेपर्यंत.**

इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) नियम, २०१६ मधील नियम ३२ नुसार, याद्वारे जाहीर घोषणा देण्यात येत आहे की, **मे. पराक्कोट इन्व्हेस्टमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** यांच्या मालमत्तेच्या स्वतंत्र लिलावासाठी बोली सादर करण्याच्या उद्देशाने संभाव्य बोलीदारांकडून स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात येत आहे.

मालमत्तेची जसे आहे जेथे आहे या आधारावर, जसे आहे जे आहे या आधारावर, जसे आहे जे काही आहे या आधारावर आणि कोणत्याही प्रकारच्या दायित्वाशिवाय या तत्वावर, **मे. पराक्कोट इन्व्हेस्टमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** यांच्या मालकीची, मा. एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाने तयार केलेल्या परिसमापन इस्टेटचा भाग म्हणून करण्यात येत आहे. ही विक्री खाली सही करणाऱ्याद्वारे https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi या वेब पोर्टलवर उपलब्ध असलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात येणार आहे.


**लिलावाची तारीख - ०६ जुलै २०२६**

| मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत (रु.) | इसारा रक्कम ठेव (रु.) | वाढीव मूल्य (रु.) |
|---|---|---|---|
| मालमत्ता - अझीस गंज, बहादूरगड रोड, दिल्ली - ११०००६ येथील, नगरपालिका क्र.१५८८-८९ असलेली, पहिल्या मजल्यावरील व्यावसायिक जागा; जिची विक्री जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे आणि कोणत्याही दायित्वाशिवाय या तत्त्वांवर केली जात आहे. | ७४,७०,००० | ७,४७,००० | ५०,००० |

**महत्त्वपूर्ण सूचना:**
१. पसिमापक, परिसमापन प्रक्रिया नियमावलीच्या नियम ३२ अन्वये परिकल्पित केल्याप्रमाणे, नगरपालिका क्र.१५८८-८९, अझीस गंज बहादूरगड रोड, दिल्ली - ११०००६ येथील पहिल्या मजल्यावरील हॉलचा लिलाव, ई-लिलाव सेवा प्रदाता म्हणजेच बान्कनेट लिलाव प्लॅटफॉर्मच्या वेब पोर्टलवर (https://baanknet.com) जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे आणि कोणत्याही दायित्वाशिवाय या आधारावर ई-लिलाव प्रक्रियेद्वारे आयोजित करेल.
२. प्रक्रियेचे तपशील आणि कालमर्यादा ई-लिलाव प्रक्रियेच्या दस्तऐवजात नमूद करण्यात आलेल्या आहेत. सदर ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज बान्कनेट लिलाव प्लॅटफॉर्मच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित वेबसाईटचा पत्ता असा आहे: https://baanknet.com/.
३. परिसमापक यांना कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, तसेच ई-लिलाव कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता पुढे ढकलण्याचा/स्थगित करण्याचा/रद्द करण्याचा/बदल करण्याचा/समाप्त करण्याचा किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेण्याचा पूर्ण व स्वतंत्र अधिकार राहील.
४. संहितेच्या कलम ३५ (१) च्या खंड (एफ) च्या तरतुदीनुसार, जर इच्छुक बोलीदार संहितेच्या कलम २९अ मध्ये (ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे) नमूद केलेले पात्रता निकष पूर्ण करण्यात अपयशी ठरले, तर ते बोली सादर करण्यास पात्र असणार नाहीत.
५. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक कागदपत्रे (तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे) सादर करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये कोडच्या कलम २९ए अंतर्गत लागू होणाऱ्या कोणत्याही अपात्रतेस ते बळी पडत नाहीत याबाबतचे हमीपत्र समाविष्ट असेल. जर कोणताही संभाव्य बोलीदार कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम ठेव जप्त करण्यात येईल.
६. ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे संबंधित कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख **शनिवार, ०४ जुलै २०२६** आहे.
७. पात्र बोलीदारांकडून इसारा रक्कम ठेव भरण्याची अंतिम तारीख **शनिवार, ०४ जुलै २०२६ रोजी सायं.०६:०० वा. पर्यंत** असेल आणि ती केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच करण्यात येईल.

**दिनांक: १० जून २०२६**
**ठिकाण: मुंबई**
सही/-
एस. गोपालाकृष्णन
पराक्कोट इन्व्हेस्टमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
नोंदणी क्र.: IBBI/IPA-002/IP-N00151/2017-18/10398

# 'उज्ज्वला' योजनेत कपात! वर्षाला ४ सिलिंडरच मिळणार



**नवी दिल्ली-** केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत मिळणाऱ्या अनुदानित गॅस सिलिंडरच्या संख्येत मोठी कपात केली आहे. आता लाभार्थ्यांना वर्षाला केवळ ४ अनुदानित सिलिंडर मिळतील. यापूर्वी लाभार्थ्यांना वर्षाला ९ अनुदानित सिलिंडर मिळत होते, ती मर्यादा आता थेट ४ वर आणण्यात आली आहे. गरीब कुटुंबांतील प्रौढ महिलांना डिपॉझिटशिवाय एलपीजी कनेक्शन देण्यासाठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना मे २०१६ मध्ये सुरू करण्यात आली होती. सुरुवातीला लाभार्थ्यांना दरवर्षी १२ अनुदानित १४.२ किलोचे सिलिंडर मिळत होते. मात्र गेल्यावर्षी अनुदानित सिलिंडरचा कोटा नऊवर आणण्यात आला होता आणि आता तो आणखी कमी करून चार करण्यात आला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रवीण माल खानुजा यांनी सांगितले की, सुधारित मर्यादा ही उज्ज्वला लाभार्थ्यांच्या सरासरी वार्षिक वापराएवढी आहे. स्वच्छ स्वयंपाकाच्या इंधनाच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ते परवडणारे बनवण्यासाठी सरकारने मे २०२२ मध्ये १४.२ किलो एलपीजी सिलिंडरवर २०० रुपयांचे लक्ष्यित अनुदान सुरू केले.

## काश्मीरला लडाखशी जोडणाऱ्या झोजिला बोगद्याचे काम पूर्ण

■ श्रीनगर

**जम्मू** आणि काश्मीरला लडाखशी जोडणाऱ्या झोजिला बोगद्याचे काम आज पूर्ण झाले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. या कामगिरीमुळे, काश्मीर आणि लडाख दरम्यान बारमाही रस्ता उपलब्ध असण्याचे दीर्घकाळापासूनचे स्वप्न सत्यात उतरण्याच्या जवळ आले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महत्त्वपूर्ण कामगिरीचे वर्णन भारतीय अभियांत्रिकीच्या इतिहासातील एक सुवर्ण अध्याय असे केले. ते म्हणाले की, आज भारतीय पायाभूत सुविधांच्या इतिहासात एक सुवर्ण दिवस आहे. हा बोगदा १४ किलोमीटर लांब आणि अत्याधुनिक आहे. मला नुकतेच सांगण्यात आले की, आतापर्यंत आपण याला आशियातील सर्वात लांब बोगदा म्हणत होतो.

पण मला हे जाणून खूप आनंद झाला आहे की, तो




जगाच्या इतिहासातही प्रथम क्रमांकावर येईल. ही लेह आणि लडाखच्या लोकांसाठी जीवनरेखा आहे. येथील उंची अंदाजे ३,००० मीटर आहे. जेव्हा काम सुरू होते, तेव्हा येथील तापमान -४ अंश सेल्सिअस किंवा त्याहूनही कमी होते. आमचे अभियंते, मजूर, कंत्राटदार आणि डॉक्टरांनी अशा अत्यंत थंडीत खूप मेहनत घेतली आहे.

## खान सरांची अटक टळली कोर्टाने जामीन मंजूर केला

■ पाटणा

**कोचिंग** सेंटरजवळ झालेल्या गोळीबार प्रकरणी शिक्षक फैसल खान उर्फ खान सर यांची अटक टळली आहे. पाटणा जिल्हा न्यायालयाने आज त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला आहे.

२ जून रोजी १५-२० जणांच्या टोळक्याने पाटण्यातील खान सरांच्या खान ग्लोबल स्टडीज (केजीएस) या कोचिंग सेंटरवर दगडफेक केली. त्यावेळी कोचिंग सेंटरच्या दोन सुरक्षा रक्षकांनी गोळीबार केला. मात्र खान सरांनी प्रतिस्पर्धी कोचिंग सेंटरच्या संचालक रोशन आनंद यांनी भाडोत्री गुंड पाठवून गोळीबार करवला, असा आरोप

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

केला. दुसऱ्या दिवशी या घटनेचा व्हिडिओ सोशल व्हायरल झाला. त्यात खान सर यांचे सुरक्षा रक्षक गोळीबार करताना आढळले. त्यानंतर रोशन आनंद यांनी खान सरांनीच हा बनाव घडवून आणला असा आरोप केला.

## चीनच्या अलीबाबा, बीवायडी, बायडू कंपन्यांना अमेरिकेने ब्लॅक लिस्ट केले

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** चीनमधील आघाडीच्या तंत्रज्ञान आणि व्यावसायिक कंपन्यांवर मोठी कारवाई करत अलीबाबा, बीवायडी, बायडू यांचा 'चिनी लष्करी कंपन्या' म्हणून समावेश केला आहे. अमेरिकेच्या संरक्षण विभागाने (पेंटागॉन) काल जाहीर केलेल्या अद्ययावत काळ्या यादीत या कंपन्यांचा समावेश करण्यात आला असून, यामुळे वॉशिंग्टन आणि बीजिंग यांच्यात अलीकडेच सुधारू लागलेल्या संबंधांवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि चीनचे



राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात बीजिंगमध्ये झालेल्या दोन दिवसीय शिखर बैठकीनंतर अवघ्या महिनाभरात घेण्यात आला आहे. या बैठकीचा उद्देश व्यापारयुद्ध व तंत्रज्ञान क्षेत्रातील स्पर्धेमुळे निर्माण झालेला तणाव कमी करणे हा होता. मात्र या निर्णयामुळे दोन्ही देशांत तणाव पुन्हा वाढला आहे. अमेरिकेच्या या निर्णयाचा चीनने तीव्र निषेध केला आहे. वॉशिंग्टनमधील युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका मधील चीनचे दूतावासाने हा निर्णय भेदभावपूर्ण असल्याचे म्हटले असून, राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेचा अतिवापर केल्याचा आरोप अमेरिकेवर केला आहे. चिनी दूतावासाच्या प्रवक्त्याने म्हटले की, परदेशात व्यवसाय करणाऱ्या चिनी कंपन्या त्या देशांच्या कायद्यांचे व नियमांचे काटेकोर पालन करतात.

## छ. संभाजीनगर जिल्हा बँक निवडणूक समीर सत्तार, संजना जाधवांचा अर्ज बाद

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती संभाजीनगर** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शिंदे गटाचे नेते अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार आणि कन्नडच्या आमदार संजना जाधव यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत.

जिल्हा बँक आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सत्तार यांनी दबावतंत्राचा वापर केल्याची चर्चा आधीपासूनच होती. विधान परिषद निवडणुकीत महायुतीच्या अधिकृत उमेदवाराविरोधात समीर सत्तार यांना बंडखोरी करायला लावून अर्ज दाखल करण्यात आला होता. नंतर माघार घेतल्यानंतर जिल्हा बँक निवडणुकीत ताकद दाखवण्याचा सत्तार यांचा प्रयत्न होता. मात्र सुरुवातीपासूनच समीर सत्तार यांचा अर्ज वादात सापडला होता. त्याचबरोबर पालकमंत्री संजय शिरसाट, त्यांची कन्या हर्षदा शिरसाट, वैजापूरचे आमदार रमेश बोरणारे आणि कन्नडच्या आमदार संजना जाधव यांच्या उमेदवारी अर्जांवरही विविध पक्षांकडून आक्षेप घेण्यात आले होते.

या सर्व आक्षेपांवर सुनावणी पार पडली. त्यात एकूण ४३ अर्ज बाद करण्यात आले आहेत. यामध्ये माजी आमदार अण्णासाहेब माने, समीर सत्तार, संजना जाधव आणि सुवर्णा जाधव यांच्या अर्जांचा समावेश आहे.

## विकास की विनाश? ग्रेट निकोबार प्रकल्पावर युवक काँग्रेसचा व्हिडिओ

■ नवी दिल्ली

**अंदमान-निकोबार** बेटांच्या दौऱ्यानंतर काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या 'ग्रेट निकोबार प्रकल्पा'वर जोरदार टीका केली आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात विनाश होणार असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने सामाजिक माध्यमांवर एक व्हिडिओ प्रसिद्ध केला असून, तो सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये 'विकास'च्या नावाखाली होत असलेल्या पर्यावरणीय हानीवर गंभीर भाष्य करण्यात आले आहे.

व्हिडिओच्या सुरुवातीला समुद्रकिनारी एका 'एलियन' सारख्या दिसणाऱ्या पात्रासोबत राहुल गांधी उभे असल्याचे दाखवण्यात आले आहे. 'सरकारने विकास म्हटले, परंतु जर पावसाळी जंगल तोडून, तेथे राहणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करून त्यांची जमीन हिरावून घेतली, तर तो कसला विकास? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. यानंतर जंगल व नफा यांच्यातील संघर्ष दाखवत 'एका बाजूला जंगल, तर दुसऱ्या




बाजूला नफ्याचा आलेख' असा संदेश देण्यात आला आहे. पुढील दृश्यांमध्ये नरेंद्र मोदी आणि गौतम अदानी नकाशावर चर्चा करताना दाखवले आहेत. 'मोदी-अदानी यांना येथे स्थावर मालमत्तेची संधी दिसली' असा आरोप या व्हिडिओतून करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्र्यांपासून मंत्र्यांपर्यंत मनधरणी बंडखोर गोकुळ गीतेची माघार नाही

■ नाशिक

**नाशिक** विधान परिषद निवडणुकीवरून महायुतीत अंतर्गत तणाव कायम आहे. भाजपाचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी अद्याप माघार घेतलेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, दादा भुसे, तसेच भाजपा नेते गिरीश महाजन यांनी गीते यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न केले. त्यातून कोणताही तोडगा निघालेला नाही.

आज गिरीश महाजन यांनी गीतेंशी चर्चा केली. त्यानंतर उदय सामंत आणि दादा भुसे यांनीही गीते यांना माघार घेण्याची विनंती केली. या चर्चांनंतरही गीते यांच्या भूमिकेत कोणताही बदल झाला नाही. महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचे बंधू किशोर दराडे यांनीही गोकुळ गीते यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी गीते यांचे बंधू गणेश गीते यांच्याशी चर्चा केली. मात्र, गोकुळ गीते माघार घेण्यास तयार नसल्याचे गणेश गीते यांनी स्पष्ट केले. दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दूरध्वनीवरून गोकुळ गीते यांच्याशी संवाद साधला. वरिष्ठ पातळीवरून समजूत काढण्याचे प्रयत्न होऊनही गोकुळ गीते हे निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर ठाम आहेत.

## साखरपुड्यासाठी निघालेल्या कुटुंबाचा अमळनेरजवळ अपघात! सहा ठार

■ जळगाव

**जळगावच्या** अमळनेर तालुक्यातील मंगरूळ गावाजवळ आज सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास कार, दुचाकी आणि राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसचा अपघात झाला. गुजरातमधील एका कुटुंबातील पाच जणांसह स्थानिक दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांमध्ये सुरेश विक्रम माळी (५२), नंदलाल गोपाल महाजन



(६०), निर्मला नंदलाल महाजन (५४), निलेश सुखदेव तावडे (२५, ता. शिंदखेडा) व एका अनोळखी महिलेचा समावेश आहे. अपघातात मृत्यूमुखी पडलेले कारमधील सर्वजण गुजरातमधील व्यारा येथील रहिवासी आहेत. महाजन कुटुंब अमळनेर येथे त्यांच्या नातेवाईकाच्या साखरपुडा समारंभासाठी येत होते. या घटनेनंतर संबंधित साखरपुडा समारंभही रद्द करण्यात आला. मंगरूळ गावाजवळ कार, दुचाकी व एसटी बस यांच्यात धडक झाल्याने हा अपघात घडला. धडकेची तीव्रता इतकी होती की कारचे मोठे नुकसान झाले व काही प्रवासी वाहनातच अडकून पडले.

## देवेगौडा यांच्या सात दशकांच्या निवडणूक राजकारणाचा शेवट

■ बंगळुरू

**माजी** पंतप्रधान एच डी देवेगौडा (९३) यांनी आपल्या सात दशकांहून अधिक काळ चाललेल्या निवडणूक राजकारणाला पूर्णविराम देत आगामी राज्यसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपा आणि जेडी(एस) यांच्या संयुक्त उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, आघाडीने एकमेव जागेसाठी धारवाडचे प्रा. एम. नागराज यांची निवड केली आहे. देवेगौडा यांच्या राज्यसभेतील पुनरागमनाबाबत चर्चा सुरू असतानाच, माघार घेण्याचा निर्णय मुख्यतः त्यांच्या कुटुंबियांच्या सल्ल्यानुसार घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. बंगळुरू ग्रामीण मतदारसंघाचे खासदार आणि देवेगौडा यांचे जावई डॉ. सी. एन. मंजुनाथ यांनी त्यांना वयोमानामुळे प्रचाराचा शारीरिक ताण टाळण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर कुटुंबियांनी उमेदवारी न घेण्याचा निर्णय घेतला.

## अर्जेंटिनाच्या पहिल्या एलएनजी निर्यातीसाठी अदानी पोर्ट्सशी १० वर्षांचा सागरी सेवा करार

■ नवी दिल्ली

**अदानी** पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडने काल अर्जेंटिनाच्या पहिल्या द्रवीकृत नैसर्गिक वायू म्हणजेच एलएनजी निर्यात प्रकल्पासाठी १० वर्षांचा सागरी सेवा करार मिळाल्याची घोषणा केली. या करारामुळे कंपनीने दक्षिण अमेरिकेत प्रवेश केला असून, आंतरराष्ट्रीय सागरी सेवा क्षेत्रातील आपला विस्तार आणखी वाढवला आहे. या कराराअंतर्गत, संबंधित कन्सोर्टियम एलएनजी वाहतूक जहाजांसाठी टगबोट सेवा, सागरी लॉजिस्टिक्स आणि पुरवठा सहाय्य तसेच कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसह सर्वसमावेशक सागरी सेवा पुरवणार आहे.

या प्रकल्पासाठी चार अत्याधुनिक टगबोटी, एक अँकर हँडलिंग टग सप्लाय व्हेसल व एक क्रू बोट तैनात करण्यात येणार आहे. संचालक अश्विनी गुप्ता यांनी म्हटले आहे की, सध्या आम्ही १२ देशांमध्ये सागरी सेवा कार्यरत ठेवत आहोत. बंदरे, एलएनजी टर्मिनल्स, राष्ट्रीय तेल कंपन्या, रिफायनरीज व ऑफशोअर सुविधांना सहाय्य करणाऱ्या, सागरी वातावरणात काम करण्याचा अनुभव आहे.

आमच्या या क्षमतांना स्थानिक भागीदारीची जोड देऊन आम्ही विश्वासार्ह सागरी परिसंस्था उभारण्यास मदत करत आहोत. यामुळे नवीन ऊर्जा व्यापार मार्गांना चालना मिळेल आणि दीर्घकालीन पुरवठा साखळी अधिक सक्षम होईल.

## सीबीएसईच्या त्रिभाषा सुत्राविरोधात फौजिया खान यांची हस्तक्षेप याचिका

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) १ जुलैपासून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा अनिवार्य केल्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यात माजी खासदार आणि महाराष्ट्राच्या माजी मंत्री डॉ. फौजिया खान यांनी हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे.

देशाचा भाषिक वारसा संवर्धन करण्याच्या उदात्त हेतूने सीबीएसईने तिसरी भाषा शिकणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला असला तरी विविध राज्यांमध्ये तिसरी भाषा शिकवण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यात सीबीएसई अपयशी ठरली आहे. त्यामुळे हा निर्णय म्हणजे केवळ विद्यार्थ्यांवर टाकलेले अतिरिक्त ओझे ठरणार आहे. त्यामुळे भाषा संवर्धनाचा उद्देश मुळीच साध्य होणार नाही,असा युक्तिवाद फौजिया खान यांनी आपल्या याचिकेद्वारे केला आहे. सीबीएसईच्या त्रिभाषा सक्तीला याशिका भंडारी - जैन आणि इतरांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने याआधी केंद्र सरकार, एनसीईआरटी आणि सीबीएसईला नोटीस बजावून यासंबंधी भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे. सीबीएसईने यासंबंधी जारी केलेल्या परिपत्रकानुसार इयत्ता नववीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## लाडकी बहीण योजना बंद करणार रोहित पवार यांच्या दाव्याने खळबळ

■ मुंबई

**पंतप्रधान** उज्ज्वला योजनेतील सिलिंडरची वार्षिक मर्यादा ९ वरून ४ वर आणल्यामुळे कोट्यवधी लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी सरकारवर जोरदार टीका करत 'लाडकी बहीण योजना' ही बंद होण्याची शक्यता व्यक्त केल्याने खळबळ उडाली आहे.

रोहित पवार म्हणाले की, उज्ज्वला योजनेतील अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या १२ वरून आधी ९ केली आणि आता ९ वरून



थेट ४ करण्यात आली. उद्या ही उज्ज्वला योजनाच सरकारने गुंडाळली तर आश्चर्य वाटणार नाही. असाच प्रकार लाडक्या बहिणींच्या बाबतीतही सुरू आहे. निवडणुकीत मतांची बेगमी होताच सरसकट लाभ दिल्यानंतर आता वेगवेगळे निकष लावून ८० लाख लाडक्या बहिणींना योजनेतून बाहेर काढण्यात आले. उद्या आणखी निकष लावून हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ दिला जाईल किंवा ही योजनाही अशीच बंद केली जाईल. पुढील निवडणुकीत पुन्हा अशाच कुठल्यातरी योजनेचे तात्पुरते गाजर दाखवले जाईल. कारण मतांसाठी फसवणूक करणारे हे विश्वासघातकी सरकार आहे.

## व्हेज बिर्यानी नको! व्हेज पुलाव म्हणा हरिद्वारच्या संतांचे हॉटेलना आवाहन

■ हरिद्वार

**हरिद्वारमधील** काही संतांनी तसेच श्री अखंड परशुराम आखाड्याच्या सदस्यांनी 'बिर्यानी' या शब्दाला आक्षेप घेतला असून व्हेज बिर्यानी नको व्हेज पुलाव म्हणा, असे आवाहन हरिद्वारमधील हॉटेलवाल्यांना उद्देशून केले आहे. बिर्यानी हा शब्द मांसाहारदर्शक आहे, असे या संतांचे म्हणणे आहे.

श्री अखंड परशुराम आखाड्याचे अध्यक्ष पंडित अधिर कौशिक यांच्या नेतृत्वाखाली संतांनी यासंदर्भात एक व्यापक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत काल देवपुरा चौक व तुलसी चौक येथील अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानांवरील व्हेज बिर्यानी लिहिलेल्या पाट्यांवर व्हेज पुलाव असे स्टीकर चिकटवण्यात आले. त्याचबरोबर संतांनी हॉटेल व दुकान मालकांशी संवाद साधून 'बिर्यानी' शब्द न वापरण्याचे आवाहन केले. या मोहिमेत जुना आखाड्याचे संत स्वामी कार्तिक गिरी, पंडित पवन कृष्ण शास्त्री यांच्यासह अनेक संत-महंतांनी सहभाग घेतला. हरिद्वारचे धार्मिक महत्त्व ओळखून अन्नपदार्थ विक्रेत्यांनी आपल्या पदार्थांच्या यादीतून बिर्यानी हा शब्द जाणिवपूर्वक वगळावा, असे पंडित अधिर कौशिक यांनी सांगितले. बिर्यानी हा शब्द हैदराबादमधून वापरात आला व कित्येक वर्षांपासून तो शब्द मांसाहारी पदार्थांशी जोडला गेला आहे.

## एच १ बी व्हिसासाठी १ लाख डॉलरची फी बेकायदेशीर

**अमेरिकन कोर्टाचा ट्रम्पना दणका**

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेच्या न्यायालयाने पुन्हा एकदा दणका दिला आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात ट्रम्प यांनी एच १ बी व्हिसासाठी फी भरमसाट वाढवून ती १ लाख डॉलरवर नेऊन ठेवली होती. मॅसेच्युसेटच्या बोस्टनमधील फेडरल न्यायालयाने हा निर्णय बेकायदेशीर ठरवून रद्द केला आहे. त्यामुळे एच १ बी व्हिसावर अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या कुशल कामगारांना मोठा दिलासा लाभला आहे. खास करून भारतीय कामगारांना याचा मोठा फायदा होणार आहे.

ट्रम्प यांच्या या निर्णयाच्या विरोधात तीन न्यायालयांमध्ये




याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वॉशिंग्टन डीसीमधील फेडरल न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णय योग्य ठरवला होता. बोस्टन फेडरल न्यायालयाने मात्र तो रद्द केला.

अमेरिकेच्या कामगार विभागाने दिलेल्या माहितीनुसार विशेष कौशल्य प्राप्त परदेशी नागरिकांना एच १ बी व्हिसासाठी अर्ज करता येतो. त्यासाठी पात्रतेचे काही निकषही उमेदवाराला पूर्ण करावे लागतात. अमेरिकन कंपन्यांना आवश्यक असलेले विशेष कौशल्यप्राप्त उमेदवार जर स्थानिकांमधून मिळत नसतील तर परदेशी उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात कंपनीच्या सेवेत घेता यावे, या उद्देशाने एच १ बी व्हिसाचा पर्याय दिला आहे.

## इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू! गुन्हा दाखल

■ विरार


**इमारतीच्या** ४ थ्या मजल्यावरून काम करत असताना खाली पडून एका मजुराचा मृत्यू झाला. विरार पूर्वेच्या कारगिल नगरमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात बिल्डर आणि ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नूरसेआलम शेख (४६) हा विरार पूर्वेच्या कारगिल नगरमधील पूजा अपार्टमेंटमध्ये काम करत होता. रविवारी संध्याकाळी तो ४ थ्या मजल्यावर काचेचे काम करत असताना तोल जाऊन खाली पडून गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला मयत घोषीत केले. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळेच ही दुर्घटना घडल्याची तक्रार मयत नुरसेआलमच्या भावाने केली आहे. या तक्रारीवरून विरार पोलिसांनी पूजा अपार्टमेंटचा बिल्डर आणि कंत्राटदाराविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०४, ११४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## राजेश एक्स्पोर्ट्स प्रकरणी गप्प का? राऊतांनी सोमय्यांना जाब विचारला

■ मुंबई

**देशभरात** चर्चेत असलेल्या राजेश एक्स्पोर्ट्स व त्याचे प्रमुख राजेश मेहता यांच्याशी संबंधित आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणावरून उबाठा खासदार संजय राऊत यांनी भाजपा नेते किरीट सोमय्या यांना पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे राऊत यांनी या प्रकरणात सोमय्या यांनी सक्रिय भूमिका घेत आवाज उठवावा, अशी मागणी केली आहे.

पत्रात राऊत यांनी राजेश एक्स्पोर्ट्स प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार, सरकारची फसवणूक आणि गुंतवणूकदारांच्या हिताशी संबंधित मुद्दे उपस्थित केले आहेत. या प्रकरणावर संसदेत व



सार्वजनिक व्यासपीठांवर चर्चा घडवून आणण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. राऊत यांनी पत्रात म्हटले की, राजेश मेहता व राजेश एक्स्पोर्ट्स प्रकरणी तातडीने आणि ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे. भाजपाच्या खासदारांना या विषयावर मार्गदर्शन करून संसदेत हा मुद्दा उपस्थित करावा. सेबी, केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांकडून निष्पक्ष चौकशी तसेच फॉरेन्सिक ऑडिटची मागणी करावी. पत्रात राऊत यांनी पुढे म्हटले आहे की, कंपनीला मंजूर करण्यात आलेल्या पीएलआय (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह) प्रकल्पाच्या निवड प्रक्रियेची फेरतपासणी करून गरज भासल्यास तो प्रकल्प रद्द करण्यात यावा.